शनिवार
१ सप्टेंबर, १९७९
७५ पैसे

# माणूस

पंचतंत्रात एक कथा आहे.
एकदा एका जंगलाला
आग लागते.
सगळे पशुपक्षी सैरावैरा
पळायला लागतात.
एका झाडावर दोन पक्षी
राहात असतात.
ते ठरवतात........



मुंबईच्या सभेत

## अटलबिहारी वाजपेयी

पृष्ठ....२

## अमीर अमानुल्ला आणि राणी सैरय्या

अफगाणिस्थानला
आधुनिक जगाच्या उंबरठ्यावर
आणून सोडणाऱ्या
एका लोकविलक्षण
शाही दांपत्याची कहाणी

## ' काबूल '

लेखांक दुसरा

पृष्ठ....८

## सप्रेम नमस्कार...



# संघाची व कॉंग्रेसची बलस्थाने कम्युनिस्ट संघटनेला उपयोगी नाहीत

विनय हर्डीकर व सतीश कामत यांची 'कुरुक्षेत्र केरळ' ही लेखमालिका वाचली. सबंध लेखमालेविषयी या टिपणात मला विचार करायचा नाही. फक्त शेवटच्या लेखांकातील सर्वसाधारण मतमांडणीच्या संबंधात एक मुद्दा लेखकद्वयांच्या नजरेस आणून द्यायचा आहे.

लेखकांनी सतत कॉंग्रेस, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि कम्युनिस्ट या संघटनांची तुलना केली आहे व पहिल्या दोन संघटनांना या देशात पाया मिळालेल्या संघटनांची व संघटनांना नेतृत्व देणारांची राष्ट्रीय प्रतिमा तयार झाली असे म्हटले आहे. त्यामानाने एकाही कम्युनिस्ट नेत्याची राष्ट्रीय पातळीवर प्रतिमा नाही. वर्गविग्रह, वर्गलढा, वर्गमुक्त समाज वगैरे संकल्पनांचा म्हणावा तितका प्रभाव भारतीय जनतेवर पडू शकला नाही. 'इथल्या कलहांचे स्वरूप ओळखून परिवर्तन घडवण्यासाठी तो संघर्षही विधायक कार्यासाठी वापरला गेला नाही,' असे मत नोंदविले आहे.

या तिन्ही संघटनांचा विचार आणि तुलना एकाच पद्धतीने आणि एकाच पातळीवर करणे मुळातच चूक आहे. कॉंग्रेस पक्षाचा उदय व विकास आणि गांधीजींसारखे नेतृत्व हे या देशात उदयास येऊ बघणाऱ्या भांडवलशाही समाजव्यवस्थेला अत्यंत अनुकूल अशा घटना होत्या आणि म्हणूनच काळाच्या गरजेप्रमाणे त्याची वाढ झपाट्याने झाली. गांधीजींनी जनसमुदायांना जागृत केले; पण त्यांच्या आशाआकांक्षांना फक्त राष्ट्रवादापर्यंत नेऊन थोपविले. हा राष्ट्रवाद संकुचित, एका जमातीपुरता, धर्मापुरता नव्हता तर सर्वसमावेशक, उदारमतवादी भांडवली अर्थव्यवस्थेला आणि समजरचनेला आवश्यक नैतिक अधिष्ठान देणारा होता. गांधीजींच्या नेतृत्वाला उचलून धरण्यात नव्याने उदयास येणाऱ्या भांडवलदारांचा व उदारमतवादाचे शिक्षण मिळालेल्या मध्यमवर्गाचा खूपच मोठा सहभाग होता.

याउलट राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने मात्र मुस्लिमविरोध व हिंदुसंस्कृतिगौरव यावर आधारित राष्ट्रवाद त्याच सुमारास जोपासायला सुरुवात केली. काळाच्या प्रवाहाच्या अगदी उलट, पुनरुज्जीवनवादावर आधारित, जन्मजात श्रेष्ठत्वाच्या कल्पनेचे नैतिक अधिष्ठान या राष्ट्रवादाला आहे. म्हणूनच मुख्यतः ब्राह्मण व व्यापारी यांचा पाठिंबा या संघटनेला मिळाला. त्यांच्या कार्यकर्त्यांचा आणि पैशाचा आधार या संघटनेला मिळाला. अनुयायी कोणतेही असोत. जुन्या धर्मकल्पनांचे व एकांगी इतिहासगौरवाचे अपील सामान्य जनतेला होणे सहज शक्य असते. विशेषतः वर्षानुवर्षांच्या धार्मिक प्रभावाने आणि सरंजामशाही अर्थव्यवस्थेने दैववादी, हतबल झालेल्या सामान्य माणसाच्या मनातील पारंपारिक भावनांना खतपाणी घालून काही काळपर्यंत कोणत्याही संघटनेची वाढ होऊ शकते. विशेषतः आर्थिक अरिष्टाच्या काळात संघटित बंडाचा पर्याय समोर नसेल तर सामान्य माणूस फॅसिझमही अगतिकपणे स्वीकारतो.

माझ्या माहितीप्रमाणे शक्तीच्या व संख्याबळाच्या दृष्टीने पाहिल्यास राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, कॉंग्रेस–अगदी फुटलेली कॉंग्रेससुद्धा–बरोबर तुलना करू शकत नाही. डॉ. हेडगेवार यांचीही प्रतिमा राष्ट्रीय नेत्याची प्रतिमा आहे म्हणणे जरा धारिष्ट्याचेच होईल. २२ कोटी दलित व आदिवासी, १० कोटी मुसलमान, ३ कोटी ख्रिश्चन आणि किमान १० कोटी हिंदु मिळून आज ४५ कोटी लोकसंख्या डॉ. हेडगेवारांना आपला


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : चौदावा
१ सप्टेंबर १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

नेता मानू शकत नाही. सांस्कृतिक कर्मकांडही फार काळपर्यंत जनतेला दिलासा देऊ शकत नाही नव्या काळातील जीवनाशी, व्यवहाराशी या कर्मकांडांचा आणि 'संघीय राष्ट्रवादी' मूल्यांचा अंतर्विरोध सतत येत असतो. एका विशिष्ट परिस्थितीमध्ये, विशिष्ट जमातीने 'अस्मिता' मिळविण्यासाठी एखाद्या संघटनेचा आश्रय घेणे ही अपवादात्मक घटना केरळमधे घडली. त्याही ठिकाणी त्या जमातीच्या आशाआकांक्षा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारसरणी यांचे संपूर्ण एकात्मीकरण झाले असल्याची खात्री देता येत नाही. ब्राह्मण व व्यापारी समाज यांचे हितसंबंध व संघ यांचे एकात्मीकरण पूर्णतः झालेले असल्याने त्यांच्यात संघाबद्दल जी निष्ठा व कडवेपणा येईल तो इतर समाजघटकांना येणे कठीण आहे. अशा परिस्थितीत संघाला फार मोठे भविष्य आहे आणि ही सतत विकसित होत रहाणारी संघटना आहे हे मानणे फार चुकीचे होईल. अर्थात् सध्यासारखी राजकीय व वैचारिक गोंधळाची परिस्थिती बराच काळ टिकली तर काही काळ संघाला ऊर्जितावस्था जरूर येईल. कारण उदारमतवादी शक्तींचा तेथे पराभव झाला असेल.

या दोन्ही संघटनांहून कम्युनिस्ट संघटना अगदी वेगळ्या प्रकारची असते. येथे मी केवळ भारतातील कम्युनिस्ट पक्षांबद्दल बोलत नाही. कम्युनिस्टांची विचारसरणीच केवळ वरील दोन संघटनांपेक्षा वेगळी आहे असे नसून तिचे परिमाण ही वेगळे आहेत. एक पुराणमतवादी, पुनरुज्जीवनवादी विचारसरणी; एक भांडवली उदारमतवादी विचारसरणी आणि कम्युनिस्टांची आर्थिक, सामाजिक, राजकीय, समतावादी कामगारवर्गीय लोकशाहीवादी विचारसरणी. ही विचारसरणी उद्याच्या समाजव्यवस्थेचे दृष्टेपण देणारी विचारसरणी आहे. भूत, वर्तमान आणि भविष्य या तीन काळांना साजेशा, अनुकूल अशा या तीन विचारसरणी या देशात एकत्र नांदत आहेत. या देशाला फार वर्षांचा इतिहास आहे. या देशामध्ये संस्कृतीकरण अतिशय प्रभावीपणाने झालेले होते. या देशाचे जुने संस्कार पुसून काढून, काँग्रेस व संघ यासारख्या संघटनांना टक्कर देत, नवे विचार, नवे द्रष्टेपण सामान्य माणसामध्ये रुजविणे अतिशय कठीण आणि अवाढव्य काम आहे. आपली तुलना चीनशी होऊ शकत नाही. कारण चीनमध्ये एकछत्री अंमल गाजविणारी, सतत विकसित होणारी भांडवली अर्थरचना व तिची राजकीय शक्ती अस्तित्वात नव्हती. आपली तुलना रशियाशी होऊ शकत नाही. कारण सर्व जग व्यापून टाकणारी प्रबळ अशी नवसाम्राज्यशाही शक्ती रशियन क्रांतीच्या वेळी अस्तित्वात नव्हती. आपल्या देशाची वैशिष्टये संपूर्णतः वेगळी आहेत आणि त्यांचा अचूक वेध घेण्यास कम्युनिस्ट संघटना कमी पडली हे म्हणणे वेगळे; परंतु त्यांच्या पुढील 'टास्कस्' आणि काँग्रेस व संघ यांच्यापुढील 'टास्कस्' हे एकच आहेत अशी गल्लत करता येणार नाही. कम्युनिस्टांमध्ये एकही राष्ट्रीय पातळीवरील नेता नाही हेही याच परिस्थितीचे फळ आहे. येथील समाजावरील भांडवलदार, जमीनदार आणि त्यांचे बुद्धिवंत प्रवक्ते यांचा प्रभाव अजून कायम आहे. कम्युनिस्ट नेता हा सर्व समाजाचा नेता तेव्हाच होतो जेव्हा बहुसंख्य कष्टकरी जनतेमध्ये एकात्मतेची भावना तयार होते.

भारतीय मुख्य प्रवाहापासून मुस्लिम समाजाच्या विघटनाची प्रक्रिया इंग्रजांनी सुरू केली आणि त्या समाजाने हातपाय आखडून घेऊन, स्वतःची धार्मिक अस्मिता जोपासता जोपासता मागासलेपणाही जोपासला आणि असुरक्षितताही जोपासली. हर्डीकरांच्या मते या धर्मकलहाचा फायदा कम्युनिस्टांनी घेतला नाही. संघाने तो घेतला आणि फार मोठी शक्ती कमावली. वर्णलढा आणि धर्मलढा हे या समाजातील फार मोठे अंतर्विरोध कम्युनिस्टांनी ओळखले नाहीत. जी विचारसरणी समाजात खऱ्या अर्थाने समता यावी, समान संधी यावी, माणुसकीचा धर्म नांदावा म्हणून प्रयत्नशील असते त्या विचारसरणीला धर्मकलहाचा फायदा कसा काय घेता येईल? उलट धर्म हा कसा जुलूम करणारा, अन्यायकारक असतो याची जीवनानुभवातून कष्टकरी वर्गांना जाणीव द्यायची आणि वर्गसंघटना बांधून कष्टकऱ्यांची एकजूट करायची हेच कम्युनिस्टांचे कार्य राहील. किंबहुना मुसलमानांतील धार्मिक आणि उच्चवर्गीय शक्ती प्रभावी झाल्या की, हिंदुधर्मातील शक्तींना संघटित करून त्यांना उत्तर न देता, धार्मिक पीठाचे छत्र किती तोटके आहे आणि तुम्ही तेथेही किती असुरक्षित आहात हे सांगून धर्मातीत अपील करण्यानेच कम्युनिस्टांचे समतेचे ध्येय ते पुढे नेऊ शकतील.

काँग्रेसने केवळ 'धर्मनिरपेक्षता' तत्त्व म्हणून मानली, काही प्रमाणात जोपासली; पण निवडणुकांच्या राजकारणासाठी पुन्हा याच जाती, जमाती व धर्मांना पोसले. कम्युनिस्टांना 'धर्मातीत' जायचे असल्याने त्यांना काँग्रेसइतक्या उघड उघड पद्धतीने धर्माची जोपासना व अनुनय करता येत नाही. त्यांची शोकांतिका अशी की, त्यांना धर्मातीत जाण्यात यश मिळाले नाही.

कर्मकांडाबाबतही कम्युनिस्टांची अडचण अशी आहे की, कर्मकांड हे साधनासाठी केवळ साधन याच स्वरूपाचे असते आणि या कर्मकांडातून फॅसिस्ट मनोवृत्तीच तयार होण्याची शक्यता असते. प्रत्येक माणसाचे मन अधिक मुक्त करणारे, अधिक डोळस करणारे, जागृत करणारे व सामुदायिक शक्तीचा प्रत्यय देऊन एकजुटीची भावना प्रज्वलित करणारेच कार्यक्रम कम्युनिस्टांना घ्यावे लागतात. गांधीजींना वासना व विकार थोपवू शकणारा अध्यात्मवादी माणूस अभिप्रेत होता. कम्युनिस्टांना जेथे विकारांना स्थान नसेल अशी नवी समाजरचना आणि नवा माणूस निर्माण करायचा असल्याने ते सामान्य माणसाला अशी सोपी कर्मकांडे देऊ शकत नाहीत. साधनासाठी साधन, संघटनेसाठी संघटना, संघटनेसाठी धर्मद्वेष आणि धर्मद्वेषावर आधारित राष्ट्रवादासाठी राष्ट्रवाद अशा पोकळ संकल्पना कम्युनिस्ट देऊ शकत नाहीत.

आणि म्हणूनच कम्युनिस्ट संघटना का वाढत नाहीत याची कारणे दुसरीकडे शोधायला हवीत. हर्डीकर आणि कामत यांनी संघ व काँग्रेस यांची बलस्थाने कम्युनिस्टांना दाखवून उपयोग नाही. त्या दोन संघटनांची विचारसरणी व स्वरूपे (फॉर्मस्) एकमेकांना अनुकूल आहेत. कम्युनिस्टांची विचारसरणी आधी समजून घेता आली तरच त्यांच्या संघटनांची स्वरूपे काय असावीत याची चर्चा करता येईल. त्यांच्या अपयशाची चर्चा करता येईल.

—छाया दातार

# अटलजींची भरारी पंखहीन ठरणार काय ?

प्रा. मुकुंद इनामदार, शिरूर

श्री. अटलबिहारी वाजपेयी यांचा 'इंडियन एक्स्प्रेस'मधून जो नुकताच एक आत्मपरीक्षणात्मक लेख प्रसिद्ध झाला आहे त्याचा त्यांच्या राजकीय विरोधकांवर जसा विशेषसा प्रभाव पडलेला दिसत नाही, तसेच 'स्वकीयां'मध्येही अपेक्षित खळबळ उडाल्याचे दिसून येत नाही. 'आम्हीच करत आलेले आरोप; पण थोडे सौम्यपणे, आता वाजपेयीही संघावर करू लागले आहेत,' ही विरोधकांची 'जितं मया'वादी भूमिका तर, 'हे आरोप पूर्वीपासून आमचे विरोधक करतच आहेत, त्यात नवीन असे काहीच नाही,' हा संघ–जनसंघीयांचा व त्यांच्या मित्रपक्षीयांचा कमालीचा धीरोदत्त (!) असा सूर! खुद्द वाजपेयींच्या सर्वसाधारण चाहात्यांना मात्र त्यांचे शब्द कानाला नवीन वाटले आहेत व त्यांचे आवाहन हलवून सोडणारे वाटले आहे. इकडे काँग्रेसने आपली सर्व तुटकी शकले जुळविण्याच्या प्रयत्नात इंदिराजींनाही निमंत्रित करावे असे देवराज अरस म्हणू लागले असता वाजपेयींच्या लेखामुळे जॉर्ज फर्नांडिस यांना पुन्हा एकदा समविचाराची जवळीक वाटू लागावी, यात वाजपेयींच्या मनोगताचे सामर्थ्यच स्पष्ट होते; परंतु वाजपेयींच्या वैचारिक आवाहनाच्या फडफडीने आपल्या क्षेत्रात भूकंप होण्याची सुतराम् शक्यता नाही, अशी संघ–जनसंघीयांची अगदी ठाम समजूत असावीशी दिसते. १२ ऑगस्टच्या 'तरुण भारत'च्या रविवार पुरवणीतील 'विदूर' यांचा वाजपेयींवरील टीकालेख वाचल्यानंतर 'हाथी चलत अपनी चाल' इतरांनी काय वाटेल तसे भुंकावे, ही सर्वश्रुत, निश्चित आणि आत्मविश्वासाने ओतप्रोत भरलेली नेहमीची भूमिका वाजपेयींच्या लेखाबद्दलही घेतली जाणार की काय, अशी साधार भीती वाटू लागली आहे.

मार्च ७७ नंतर राजकारणातील कित्येक व्यक्ती व पक्ष बदलले असा पुकारा केला जाऊ लागला. मोरारजीभाई नखशिखान्त बदलले, समाजवाद्यांची दृष्टी निवळली, यशवंतरावांची भाषा बदलली, इंदिराजी सुधारल्या, एक ना दोन, सर्वच जण जणू बदलाचे वारे प्याले. फार काय संघाने आपली भूमिका बदलल्याचे शिफारसपत्रही त्याला अगदी आणीबाणीच्या कारावासापासून देण्यात येत होते. आज एखाद्या आंधळ्यालाही एवढे स्पष्ट दिसत आहे की, आपापल्या हितसंबंधांमध्ये गुंतलेली ही सर्व मंडळी होती तशीच आहेत. अपवाद अटलबिहारींचा सांगता येईल. अटलबिहारींनी आपल्या लेखात जी स्पष्टता व परखडपणा दाखविला आहे तो त्यांच्या आजवरच्या सुनिश्चित व समग्र भूमिकेतील सर्वकष बदल नसला तरी त्यांच्या वतीतील एक लक्षणीय बदल आहे, यात शंका नाही. श्री. वाजपेयी यांची राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरील टिप्पणी निस्संदिग्ध आहे–

(१) संघ राजकारणापासून मुक्त राहू शकलेला नाही. त्याला संस्थात्मक तटस्थता दाखविता आलेली नाही. संघाच्या संस्थात्मक अस्तित्वाविषयी वाजपेयींनी वाद उपस्थित केलेलाच नाही; पण एक महान् व संस्थात्मक–संघटनात्मक शक्ती म्हणून संघाने 'किंग मेकर'ची वठवलेली भूमिका एकंदरीत महाग पडत आलेली आहे. सामाजिक–सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रामधील विभाजनरेषा संघाने आखली पाहिजे असे वाजपेयींना निक्षून सांगावयाचे आहे. वाजपेयींचा हा मुद्दा राजकीय वाद उपस्थित करण्यासाठी नसून मूलभूत तात्त्विक स्वरूपाचा आहे. संघचालक या प्रश्नावर आता प्रतिवाद करू शकणार नाहीत.

(२) संघाने अहिंदूंचा स्वीकार करण्याबाबत त्वरित पावले उचललेली नाहीत. (संघप्रवेशाचे प्रकरण केवळ विचाराधीन आहे.) संघाला या बाबतीत पुढाकार घ्यावयाचा नाही, अशी शंका कोणास आल्यास ती प्रामाणिक ठरेल, असे वाजपेयींनाही वाटते. 'विदुरा'-सारखे संघाचे पारंपारिक समर्थक असे म्हणतात की, संघाला सरतेशेवटी भारतीयांचे भारतीयीकरण साधावयाचे आहे. हे कार्य करताना राजकीय यशापयशही दूर ठेवावे असा टोकाचा विचार स्वीकारण्याची त्यांची तयारी आहे.

संघ प्रवेशाबाबतची संथ व धीमी भूमिका ही आपल्या राजकीय प्रगतीची मर्यादा आहे, हे वाजपेयींनी नुसते ओळखलेच नाही तर त्याचा जाहीर उच्चारही केला आहे; पण त्यांचे हे म्हणणे केवळ 'अरण्यरुदन' ठरण्याची शक्यता जास्त आहे. मार्च ७७ नंतर संघ-प्रवेशाबाबत ज्या उदार मुलाखती झडत होत्या व संघटनात्मक धामधूम चाललेली होती, त्या पार्श्वभूमीवर आजची सामसूम बोलकी आहे.

(३) संघाने अंधःश्रद्धा व अनिष्ट रुढींविरूद्ध मोहीम काढावी व काही विधायक, ठोस कार्यक्रम (केवळ प्रासंगिक नव्हे) बांधून घ्यावे, हे सांगण्याची पाळी वाजपेयींना का यावी? संघाच्या विधायक कार्यशक्तीबाबत विश्वास असूनही आजवरचे संघाचे कार्य प्रासंगिक व फुटकळ स्वरूपाचे तसेच प्रतिक्रियारूप असेच काहीसे घडले आहे असे त्यांचे म्हणणे आहे. ही प्रतिमा बदलणे आवश्यक ठरते. ती बदलत असता संघाचे संघटनात्मक आरोग्य अधिक सुधारेल हीच शक्यता वाजपेयी सुचवीत आहेत; पण ती स्वीकारण्याच्या मनःस्थितीत संघाच्या केंद्रीय नेतृत्वाचा गाभा राजी नसावा. हेच अनुमान 'विदुरा'च्या लेखावरून काढावे लागते.

## सांस्कृतिक सेतुबंधन

संघाबाबत आजमितीला काहींच्या मनात भीती व शंका असू शकतात, हे वाजपेयींचे उद्‌गार म्हणजे एका निष्ठावान संघवाद्याने प्रस्तुतच्या संक्रमणकालीन परिस्थितीला दिलेला हुंकार आहे; पण वाजपेयींचे हे सुधारणावादी विचार पचण्यासारखे नसल्याने विदुरांनी वाजपेयींना संस्थात्मक नेतृत्वाच्या गरजेची व महत्त्वाची 'रेकॉर्ड' ऐकविली आहे. हनुमंताला श्रीराममहिमा सांगत सुटावा अशीच ही लोकविलक्षण गोष्ट आहे. वैचारिक मतभेद मांडण्याचा अभिनय करीत विदुरांनी वाजपेयींना सुसभ्य भाषेत बरेच दुखावणारे चिमटेही घेतले आहेत. विदुरांच्या टीकालेखातील 'गेल्या ५५ वर्षांत काँग्रेस हेच म्हणत आली आहे,' 'भ्रष्ट राजकारण्यांच्या हाती सामाजिक–सांस्कृतिक संस्था दिल्याने राजकीय प्रदूषणच वाढेल,' 'संघाचे 'भारतीयीकरणाचे' कार्य राजकीय यशापयशावर अवलंबून नाही,' वगैरे विधाने पुरेशी बोलकी आहेत. वाजपेयींच्या सुधारित मनोवृत्तीची वासलात कशी लावली जाईल याची सूचनाच या पारंपारिक दृष्टिकोनात आहे. वाजपेयींचा संघातील दीर्घकालीन सहभाग. त्यावरील अविचल श्रद्धा व केवळ राजकीय सोयीसाठी नव्हे तर राजकारणाचा समतोल बुद्धीने विचार करून प्रकट केलेली मते लक्षात न घेता, त्यांना 'उपेक्षेने व अनुल्लेखाने' मारणे हीच खेळी संघीयांकडून होणार की काय, असे वाटू लागले आहे. संघाच्या तथाकथित सांस्कृतिक सेतुबंधनासाठी वाजपेयींसारख्या राजकीय नेत्याचा बळी घेणे संघाच्या मूलभूत समष्टिवादात बसेल, हे भविष्य अप्रिय वाटले तरी अधिक सुसंगत व संभाव्य वाटते. ते खोटे पडावे यासाठी आवश्यक ती ग्वाही संघाकडून येणे जरुरीचे आहे.

७७ च्या लोकक्रांतीनंतर एकाधिकारशाही विरुद्ध एक समान सूत्र धरून सर्व काँग्रेसविरोधी गट एकत्र रहावेत यासाठी पाच घटकपक्षांतून एक पक्ष स्थापन केला गेला. आम्ही आता जनसंघीय नाही तर केवळ जनता पक्षाचे आहोत असे वाजपेयींनी तन–मन–धन ओतून सांगितले. ही एकसत्ता टिकविण्यात सक्रिय सहाय्य नाही तर निदान निष्क्रिय सहानुभूती तरी संघ दाखवेल ही अपेक्षा होती. भारतातील संघटनात्मक अशी मोठी शक्ती म्हणून संघाने हे दायित्व पेलणे अगत्याचे होते. संघाने ते तर नाकारलेच; पण यापुढे आता निवडणुकीत कोणत्याही पक्षाचे बाजूने पडणार नाही असे म्हणून एक प्रकारची घरसोडवृत्ती प्रगट केली आहे. वाजपेयींच्या लेखातील व्यथा पाहिल्यानंतर असं जाणवते की, भारताला 'भारतीय' करण्याचे कार्य संघ जेव्हा पार पाडावयाचे असेल ते पाडो; पण जनसंघाला जनता पक्ष बनू देण्यातही संघाने मोकळ्या मनाने साथ दिलेली नाही. जनता पक्षाचे राजकीय मित्र कमी होण्याचे कारण वाजपेयींसारखे विचारवंत संघाच्या स्वभावधर्मामध्ये पाहू लागले आहेत ही गंभीर दखल घेण्यासारखी बाब आहे. वाजपेयींच्या प्रामाणिक शंका अनुत्तरित रहाव्यात हे संघाच्या नेतृत्वाच्या सोयीचे असले तरी शेवटी ते हिताचे नाही. संघ आपला 'बहिरा कान' वाजपेयींकडे फिरविणार असेल, तर त्यांची आजची न्यूनता उद्या शून्यतेकडे घेऊन जाईल हे मत कटू असले तरी स्पष्टपणे आत्ताच मांडले पाहिजे.

वाजपेयींच्या लेखाला असाधारण महत्त्व आहे ते त्यांच्या प्रदीर्घ राजकीय तपस्येमुळे आलेले आहे. विरोधी पक्षाचे एक आघाडीचे नेते म्हणून अनेक वर्षे संसदेत काम केल्यावर, परराष्ट्रखात्याचे मंत्री म्हणून गेल्या दोनअडीच वर्षांची सचोटीची कारकीर्दही त्यांच्या नावे जमा आहे. राजकारणाची सर्व वळणे, वळसे व वेलांटचा पाहिल्यामुळे त्यांची राजकीयसंवेदनक्षमता कमालीची तरल झालेली आहे. सतत पंतोजीची भूमिका घेणाऱ्या संघाने आपल्या या एकनिष्ठ पाईकापासून काही शिकण्यासारखे नाही, असे म्हटल्यास ती एक दुर्दैवी गोष्ट ठरेल. संघ ही काही बिनराजकीय संस्था नाही असे 'विदुर' आपल्या चिकित्सालेखात ठणकावून सांगतात; पण मग संघ आपल्या राजकीय अंतःप्रज्ञा राजकारणाच्या बाह्यदर्शनावरच अवलंबून ठेवणार की वाजपेयींसारख्यांचा राजकारणातील inside view देखील उपयोगात आणणार असा अतिशय मूलगामी प्रश्न उपस्थित झाला आहे.

## दोन भूमिका

वाजपेयींच्या वैचारिक आवाहनाकडे दुर्लक्ष करणे याचा संघप्रणीत तर्कनिष्पन्न अर्थ असा, की वाजपेयी एकात्म व्यक्तिमत्त्वाचे राहिले नसून त्यांचे व्यक्तिमत्व दुभंगत चालले आहे. म्हणजेच वाजपेयींसारख्यांचे मत आता दुय्यम दर्जाच्या संघ-कार्यकर्त्याचे मत आहे, असे ठरविले जाईल. वाजपेयींचे मत थोडेसे दूर ठेवून असे म्हणता येईल की संघाने आपला मार्ग काय तो तातडीने ठरवायचा आहे. संघाचा पारंपारिक विचार हाच ज्यांचा अधिकृत तत्त्वविचार आहे, असे सरकार येईपर्यंत संघ वाट पाहील, त्याला वाजपेयींचा सुधारणावाद नामजूर आहे, अशी एक भूमिका संघ घेऊ शकतो अथवा सत्ताविरहित समाजसेवा हेच आपले ध्येय आहे असे जाहीर करून आपले बिनराजकीय स्वरूपही स्पष्ट करू शकतो. यापैकी कोठलाही निर्णय करावयाचे संघनेत्यांनी ठरविले असेल तर संघाच्या सध्याच्या स्वस्थ प्रकृतीबद्दल अस्वस्थ होण्याचे कोणालाच कारण नाही; पण या निर्णयाची योग्य ती किंमतही संघाला भरावी लागेल. संघाची राजकीय बाजू एक तर अगतिक होत जाईल अथवा खुरटलेली रहात जाईल. आपण पुरविलेल्या राजकीय नेतृत्वात काही गुणात्मक बदल हवा की नको? हा प्रश्न वाजपेयींच्या लेखामुळे पणास लागला आहे.


भारतीय काँग्रेस आपल्या दीर्घकालीन राजकीय वाटचालीनंतर भारतीयांचे सनातन प्रश्न अनंत कालपर्यंत सोडविण्याचे आश्वासन जनतेला देत आलेली आहे. गरिबी सनातन आहे. तरी ती हटविण्याचा आम्ही सदैव प्रयत्न करू. त्यासाठी आम्हाला सदैव सत्तेवर ठेवा, असा मोठा गोजिरवाणा युक्तिवाद काँग्रेस नेते करत आले आहेत. भारतीय समाजाच्या उद्धारासाठी ठोस कार्यक्रम समोर न ठेवता 'भारताच्या भारतीयकरणाचे' अनंतकालीन ध्येय डोळ्यांसमोर ठेवणारा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काँग्रेसहून काही नवीन पिंडाचा आहे, असे म्हणण्यास भरीव कारण सापडत नाही. वाजपेयींना राजकीय जीवनातील ही कोंडी जाणवली आहे, ती फोडण्याची तळमळही त्यांच्या या लेखामुळे दिसून आली आहे; पण आपल्या वैचारिक बंदिस्तवादापुढे संघाला ही कोंडी कोंडीच वाटत नसेल तर वाजपेयींनी एकटे जागे राहून काय फायदा होणार?

उलट संभव असा आहे की, वाजपेयींच्या मनोगतापासून पुनर्जागरणाचा प्रारंभ होण्यास संघाकडून प्रतिबंधच केला जाईल. वाजपेयींची जन्मजात काव्यात्म वृत्ती उचंबळली आहे झाले, व्यवहारात कणखरपणा हवा असतो असे शहाजोगपणे सांगितले जाईल. वाजपेयींनी

एवढ्या सहजपणे राजकीय शरणागती द्यावयास नको होती अशी हळहळही कोठे व्यक्त होईल. वाचाळ समाजवाद्यांनी उठविलेल्या वावड्यांनी वाजपेयी संभ्रमित झाले आहेत, त्यांनी स्वधर्माचीच कास धरावी असे सुचविले जाईल. वाजपेयी आपला ठामपणा टिकवून धरतील तर त्यांनी त्यात नवीन काय सांगितले, असे म्हणून त्यांना धुडकावण्यात येईल व अलगही पाडले जाईल. काही अधिक आशावादी संघबंधु 'हे वाट चुकलेले कोकरू' कालांतराने पुन्हा कळपात येईल असाही विश्वास बाळगतील. वाजपेयींचे सहप्रवासी काय अथवा विरोधक काय 'उशीरा सुचलेले शहाणपण', 'वेळ निघून गेल्यावर घेतलेला निर्णय' अथवा संघाचा 'राजकीय स्टंट' याच भावनेतून त्यांच्या या प्रतिक्रियेकडे पाहात आहेत. तात्पर्य वाजपेयी तोंड जरूर उघडतील. तेवढे अलौकिक धैर्य त्यांनी दाखविले आहे; परंतु ते हातपाय हालवू शकतील असा संभव कमीच आहे, परिस्थिती व संघाचा कल त्यांच्या बाजूचा नाही.

संघाची 'जैसे थे' वादी भूमिका प्राचीन आहे. विवेकानंदांनी हिंदु धर्म आणि लोकांसंबंधी एके ठिकाणी असे म्हटले आहे की, 'जगात हिंदु धर्माएवढा उदार (सहिष्णु) धर्म दुसरा नाही आणि हिंदु लोकांएवढे अनुदार (असहिष्णु) लोकही दुसरे कोठे नसतील.' हेच उद्गार थोडासा फेरफार करून वाजपेयींना व संघाला लागू करता येतील. 'वाजपेयींएवढा उदारमतवादी नेता भारतीय राजकारणात नाही आणि संघाइतकी अनुदार, आत्मकेंद्री, प्रबल संघटनाही दुसरी दिसत नाही.' संघाच्या या अपरिवर्तनीय भूमिकेमुळे काही नजीकचे राजकीय परिणामही थोपविता येणार नाहीत. संघाने आपल्या विचारसरणीत योग्य तो फेरविचार केला नाही तर जनसंघप्रधान जनता पक्षाची संसदीय विरोधक म्हणून असलेली प्रतिमा ढासळत जाणार आहे. आता तर त्यांचा सत्तेचा आधारही गेलेला आहे. जगजीवनबाबू संघीयांबरोबर सहप्रवास करतात. ही वस्तुतः संघाची जमेची बाजू आहे; परंतु यापुढे बाबूजीही बिचकत आहेत, दलितांविषयीच्या मूळ भूमिकेपासून ढळत आहेत, असा मारक आरोप त्यांच्यावरही केला जाईल. केवळ प्रचारबाजीने जनता पक्षाकडून केन्द्रीय सत्ता हिसकावून घेता येते तर आणखी थोडी राळ उडवून त्याची विरोधी पक्ष म्हणून असलेली प्रतिमाही छिन्नभिन्न करणे सत्ताधाऱ्यांना अवघड नाही. चरण सरकारसारखे वस्तुतः हातापायांवरून वारे गेलेले सरकारही संकटांचे गिरी उल्लंघू शकेल, ते संघाच्या संवेदनाशून्य आणि कल्पनाशून्य भूमिकेमुळेच.

दुसऱ्या स्वातंत्र्याच्या संपादनामध्ये संघाचा मोठा वाटा कोणीच नाकारीत नाही; पण संघाच्या आत्ताच्या अलौकिक आत्मकेन्द्रिततेमुळे त्या स्वातंत्र्याचा लोप होऊन सर्वकष तऱ्हेची अधिकारशाही व तज्जन्य गुलामगिरी दिल्लीच्या तक्ताकडे अगोदरच वाटचाल करू लागली आहे. ही गुलामगिरी अद्वितीय अशी असणार आहे. याचा विचार करण्याइतका लवचिकपणा संघाने दाखवावयास हवा होता, हवा आहे. वाजपेयींच्या क्रांतिदर्शी दृष्टीला संघ प्रकाश पुरविणार की भेसूर राजकीय अंधाराला निमंत्रण देणार याचा खुलासा आणखी काही दिवसांतच व्हावयाचा आहे. वाजपेयींनी आपल्या सुस्पष्ट लेखाद्वारे उदार व निर्भय विचाराचा घोडा धर्मसंकटाच्या वेळी मोकळा सोडला आहे, त्याला विरोधकांच्या भूमीतून विरोध होतो की संघशाखेच्या मैदानातच लगाम लावून ठाणबंद केले जाते हे पाहावयाचे आहे. □

हे पुस्तक प्रत्येक ग्रंथालयात जाईल अशी व्यवस्था करण्यासाठी शासनाने आवर्जून प्रयत्न करावेत.
(रविवार केसरी दि. १० सप्टेंबर १९७८)

—डॉ. वा. ना. कुबेर

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

पुणे वार्ता :

# शिस्तबद्धता आणि निःस्वार्थी सेवा हेच जपान-जर्मनीच्या यशाचे श्रेय आहे —पालखीवाला

सोमवार दि. २० ऑगस्ट ! दिल्लीतल्या राजकीय घडामोडींनी उत्कर्षबिंदू गाठलेला. अगदी आपण बरं की आपलं काम बरं, असं वागणारा सामान्य माणूसही वर्तमानपत्रातली तीच बातमी पुन्हा पुन्हा वाचत रेडिओला कान देऊन बसलेला. संध्याकाळ झाली. ताज्या बातम्यांचा जोर ओसरला होता; पण पुढेही दोन-तीन दिवस अशाच, याहूनही वादळी बातम्या येणार आहेत हे प्रत्येकालाच कळत होतं. स्वतःचे आडाखे प्रत्येकजणच बांधत होता, दुसऱ्याला सांगत होता; पण त्याचवेळी दुसऱ्याचे, एखाद्या तज्ज्ञाचे किंवा राजकीय निरीक्षकाचे विचार ऐकायलाही उत्सुक होता. या उत्सुकतेपोटीच त्या दिवशी संध्याकाळी पुण्यातला नेहरू मेमोरिअल हॉल भरून गेला होता. गर्दी औसंडून वाहात होती. माणसं भराभर येत होती. बसने, रिक्षाने, स्वतःच्या गाडीतून ! आज संध्याकाळी या ठिकाणी विख्यात कायदेपंडित नानी पालखीवाला यांचं भाषण होणार होतं. पुण्याच्या रोटरी क्लबतर्फे आयोजित केलेल्या या भाषणाचा विषय होता ' द वर्ल्डज् टू लार्जेस्ट डेमॉक्रसिज् !' श्री. पालखीवाला यायला अवकाश होता; पण हॉलमध्ये शिरायलाही जागा नव्हती. कित्येकांच्या सुटाची घडी मोडली होती, सेंटचा वास उडून चालला होता; पण आज याचीही त्या संभावितांना पर्वा नव्हती. कसंही करून हॉलमध्ये शिरकाव करून घेणं एवढंच त्यांचं उद्दिष्ट होतं.

बरोब्बर सात वाजता श्री. पालखीवाला आले. गर्दीतून वाट काढत स्टेजवर पोचले. टाळ्यांचा कडकडाट झाला. रोटरी क्लबची काही नैमित्तिक कर्मकांडं आटोपल्यावर श्री. पालखीवाला यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली—

' जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीवादी शक्ती म्हणून आज दोनच देशांचा उल्लेख करता येईल— एक, अमेरिका आणि दुसरा, भारत ! भारताच्या एकतृतियांश भू-भाग असलेली शक्तिमान अमेरिका आणि अमेरिकेच्या तिप्पट लोकसंख्या असलेला भारत या दोन देशांमध्ये पुष्कळच साम्य आढळतं. स्वातंत्र्याकरता झुंजणारी अमेरिका ही ' First World 'मधली मोठी शक्ती आहे, तर ' Third World 'मध्ये ते श्रेय भारताला दिलं जातं. अमेरिकेमुळेच कम्युनिस्ट साम्राज्यवादाला मोठा शह बसला आहे, तर आणीबाणीनंतरची क्रांती भारतात घडली नसती तर लोकशाहीवादी शक्तींच्या इतिहासातील एक मोठा पराभव म्हणून त्याची नोंद झाली असती. धर्माचं क्षेत्र मान्य करणाऱ्या भारत व अमेरिका या दोन देशांमध्ये विशिष्ट नैतिक मूल्ये आणि तत्त्वांच्या बाबतीत संपूर्ण मतैक्य आहे. परस्पर जिव्हाळा आणि विश्वबंधुत्व यांचा महान शक्ती म्हणून गौरव जगातील याच दोन देशांनी सर्वात जास्त केला आहे. तत्त्वज्ञानाच्या आणि पारमार्थिक क्षेत्रात तर सबंध जगाचं नेतृत्व करण्याची क्षमता योगी अरविंद आणि रवींद्रनाथ टागोर यासारख्या तत्त्वज्ञांनी भारताला मिळवून दिली आहे. भारताच्या या वैशिष्ट्यांचं अमेरिकन जनतेला नेहमीच आकर्षण वाटत आलेलं आहे.

' म्हणूनच १५ ऑगस्टला श्री. चरणसिंग यांनी लाल किल्ल्यावरून भाषण करताना अणुबाँबबद्दल जे वक्तव्य केलं त्याचा मला अतिशय विषाद वाटतो. भारताच्या अणुविषयक धोरणामुळे सबंध जगात त्याची प्रतिष्ठा वाढली होती. अणुबाँब बनविण्याची क्षमता असूनही तो न बनविणाऱ्या या देशाला तसले. शंभर बाँब बनवूनही येणार नाही अशी नैतिक शक्ती, नैतिक अधिष्ठान प्राप्त झालं होतं. म्हणूनच श्री. मोरारजी देसाईंच्या अणुविषयक धोरणाची साऱ्या जगाने प्रशंसा केली होती. मला आठवतं, ३० जानेवारी १९४८ साली म. गांधींचा संध्याकाळी खून झाला. तत्पूर्वी थोडाच वेळ आधी, दुपारी तीन वाजता ' लाईफ ' या जगप्रसिद्ध नियतकालिकाच्या वार्ताहराने त्यांची मुलाखत घेतली होती. त्याने महात्माजींना असा एक प्रश्न विचारला होता की, जर समजा तुमच्या देशावर कोणी अणुबाँब टाकला तर तुमची प्रतिक्रिया काय असेल ? क्षणाचाही विलंब न लावता गांधींनी उत्तर दिलं होतं — ' I will pray for the pilot ! ' ही भारताची शक्ती आहे. चरणसिंगांची अणुविषयक धोरणाचा फेरविचार करण्याची घोषणा म्हणजे एखादा मनुष्य माझ्या घरावर दरोडा घालतो, म्हणून मीही त्याच्या घरात घुसून दरोडा घालेन, या पातळीवरील आहे. त्यांच्या या घोषणेला लोकप्रियता मिळेल; पण त्यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनेल. भारताला एकूण परदेशी मदतीच्या सर्वात जास्त हिस्सा देणारी अमेरिका याचा गंभीरपणे विचार करेल आणि त्याचा परिणाम सप्टेंबर–ऑक्टोबरपर्यंत भारताकडे येणाऱ्या १९.८ टन एनरिच्ड युरेनियमवर झाल्याशिवाय राहणार नाही. अमेरिकेने खरोखरच काही विरोधी निर्णय घेतला तर तारापूरची अणुभट्टी बंद पडेल आणि त्याची झळ लाखो कुटुंबाना पोहोचेल. देशाच्या नेत्याने केवळ बहुजनांना खूष ठेवायचं नसतं, थोडा देशाच्याही भविष्याचा आणि भवितव्याचा विचार करायचा असतो.

' ज्या देशामध्ये वकील आणि ब्यूरोक्रॅट्स् समृद्ध होतात, त्या देशात निश्चितच काही तरी घोटाळा असतो. अमेरिका आणि भारत या दोन्ही देशांमध्ये आज ही वस्तुस्थिती आहे. अमेरिकेत तर नुसत्या ब्यूरोक्रॅटिक पेपर वर्कसाठी ११३ दशलक्ष माणसं राबत आहेत.

' अर्थात आज आपल्या देशात जे चित्र दिसतंय ते काही कायम स्वरूपाचं नाही. It is just a passing phase ! लोकशाही जीवनपद्धतीमधील सर्वात मोठा प्रयोग आपण करत आहोत. जगातील एकूण लोकसंख्येच्या एक सप्तमांश लोक स्वतःच

पृष्ठ २३ वर

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

## ॐ गणानाम् त्वाम् गणपतिम् हवामहे ॥

हे गणांच्या गणपते ! तुझे स्वागत असो ! आम्ही तुझी पूजा करतो. आमचे कल्याण कर ! आमचे हे गणराज्य डिसेंबरपर्यंत सांभाळ ! डिसेंबर म्हणजे काय हे तुला कळणार नाही. तेव्हा प्राचीन आर्यभाषेत सांगतो. पौषमास लागेपर्यंत हे आमचे गण-राज्य संभाळ! आमचे जीवन सुसह्य राहू दे. महर्गता राहू देऊ नको!

□

या वर्षीच्या भाद्रपद शु. चतुर्थीचे म्हणजे गणेशचतुर्थीचे माहात्म्य जास्त आहे. कारण रविवारी किंवा मंगळवारी येणाऱ्या गणेश-चतुर्थीला विशेष माहात्म्य असते. गणपती आणि गणेशाचा उत्सव यासंबंधीची मूळ माहिती आज पुष्कळांना ठाऊक नसेल म्हणून थोडी माहिती देतो.

गणेशचतुर्थीला गणपतीची मूर्ती आणून तिची सिद्धिविनायक म्हणून पूजा करावयाची असते. त्या वेळी एकवीस मोदकांचा नैवेद्य दाखवून दहा नावे गुंफलेला पुढील मंत्र म्हणून एकवीस दूर्वा अर्पण करितात,

‘ गणाधीश नमस्तेस्तु उमापुत्राघनाशन
एकदन्ते भवक्त्रेति तथा मूषकवाहन
विनायकेशपुत्रेति सर्वसिद्धिप्रदायक
कुमार गुरवे तुभ्यं पूजानीयाः प्रयत्नतः ॥

हा उत्सव दीड दिवसांचा असतो. गणेश-चतुर्थीस मध्यान्ही पूजिलेला गणपती दुसऱ्या दिवशी सायंकाळी विसर्जित करतात. कित्येक घरी तो ५-७-९-१० दिवस ठेवतात. गणेश चतुर्थीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे ऋषि-पंचमीस गणपतीचे वाहन उंदीर, त्यास खिरीचा नैवेद्य दाखवितात. गणेशचतुर्थीच्या दिवशी चंद्र पाहू नये असे आहे. त्या दिवशी चंद्र पाहिल्यास चोरीचा आळ येतो. श्रीकृष्णाला हे दर्शन घडल्याने त्याच्यावर स्यमंतक मणी चोरल्याचा आळ आला. उंद-रावर बसून चाललेल्या गणपतीला चंद्र हसला. तेव्हा गणपतीने चंद्राला तुझे तोंड कुणी पहाणार नाही असा शाप दिला. शापाने कष्टी झालेल्या चंद्राला गणपतीने उःशाप दिला की फक्त गणेशचतुर्थीच्या दिवशी तुझे तोंड कुणी पहाणार नाही ! पाहील त्यावर चोरीचा आरोप येईल! तुम्ही जर चुकून गणेशचतुर्थीला चंद्र पाहिलाच तर स्यमंतकमण्याचा मंत्र म्हणावा.

॥ सिंहः प्रसेनमवधीत् सिंहो जाम्मवंता हतः
सुकुमारक मा रोदीस्तिव एष स्यमंन्तकः ॥

अर्थ—सिंहाने प्रसेनाला मारले, सिंहाला जांबवंताने मारले. हे सुकुमारा ! तू रडू नको. हा स्यमंतकमणी तुझा आहे.

वरील श्लोक म्हणताना पाणी प्यावे व स्यमंतकमण्याची कहाणी ऐकावी. कोकणात याविषयी एक लोककथा आहे. ज्याला असे चंद्रदर्शन घडेल त्याने शेजाऱ्याच्या घरावर दगड मारावा किंवा त्याच्या परसूतले झाड तोडावे. शेजारी शिव्या देत आला की त्या ऐकून चोरीचा आळ टाळतो.

रामजन्माचे दिवशी रामायण ऐकावे व कृष्णजन्माचे दिवशी कृष्णलीला ऐकाव्यात, त्याप्रमाणे गणेशचतुर्थीच्या दिवशी गणेशाच्या गोष्टी ऐकाव्यात म्हणून गणेशचतुर्थीविषयीचे शास्त्र व लोककथा सांगितल्या.

□

पेशव्यांचे दैवत गणपती असल्यामुळे पेशव्यांचे वेळी गणेशोत्सव थाटाने होत असे. हीच प्रथा पुढे चालू ठेवून लो. टिळकांनी सार्वजनिक गणपती बसवून त्याला राष्ट्रीय स्वरूप दिले. या वेळी ज्ञान देणारी व्याख्याने करावीत, राष्ट्रीय जागृतीचे पोवाडे गावेत, कथा, प्रवचने, कीर्तने यांतून देशभक्तीचा प्रचार करावा. विद्यार्थ्यांचे मेळे काढून त्यांच्या तोंडी बसतील अशी देशपर गाणी त्यातून म्हणावी. असा सर्व लोकांत सलोखा बांधणारा हा उत्सव दहा दिवस करून अनंत-चतुर्दशीच्या दिवशी मिरवणुकीने या सार्व-जनिक गणपतीचे विसर्जन करावे असे त्यांनी सांगितले.

अर्थात लोकमान्य टिळकांनी घालून दिलेला हा गणेशोत्सव आता उरला नाही. लो. टिळक जर पुन्हा अवतरून पुण्यातल्या रस्त्याने गेले तर त्यांना आपण घालून दिलेलाच हा उत्सव आहे हे कळणारसुद्धा नाही. पण पुण्यातील गणपतीउत्सवाची कीर्ती अंतरिक्षात पोहोचली आहे हेही त्याना समजणार नाही. असे म्हणतात की, अंतराळात जाऊन पृथ्वीभोवती फिरणाऱ्या रशियाच्या एका स्पुटनिकातील अंतराळवीरांनी पृथ्वी-वर प्रचंड उजेड पाहिला. प्रथम त्यांना वाटले की ते अमेरिकेतील न्यूयार्क वगैरे असावे. पण न्यूयॉर्कचे दिवे त्यांना पाठ होते. हा प्रकाश त्या दिव्यांच्या अनेक पटीनं प्रखर होता. तो वणवा तर नसेल ? त्यांना चिंता वाटली. घरापासून माणूस गेला की त्याला घरातील सर्वाविषयी फार आत्मीयता वाटू लागते. पृथ्वीवर कुठेतरी वणव्याचा डोंब उसळलाय या चिंतेने त्यांनी आपल्या ‘ तळा ’ वरच्या शास्त्रज्ञाना रेडिओ संदेश धाडला. तो संदेश येताच शास्त्रज्ञांनी इतर देशांतील शास्त्रज्ञांना तो कळविला. स्पुटनिकवरून आलेल्या संदेशातील खुणांवरून थोड्याच वेळात त्यांनी पृथ्वीवरील ही वणव्याची जागा शोधून काढली. ती भारतात निघाली. मग भारतात शोध घेता ती महाराष्ट्रात आणि महाराष्ट्रात शोध घेता ती जागा पुणे नगरीची निघाली. मग लक्षात आले की हा जो प्रकाशाचा वणव्यासारखा झोत आका-शातून दिसतो आहे तो पुण्यातील सार्वजनिक गणपतींच्या रोषणाईतील ‘ लायटींग’चा आहे.

□

गणपतींपुढच्या ‘ लायटींग’चा आनंद यंदाही आम्हाला लुटता येईल, या खात्रीने या वर्षी आम्ही दरवर्षीप्रमाणे आमचा घरचा गणपती आणायला चतुर्थीच्या आदल्या दिवशी म्हणजे शनिवारी संध्याकाळी निघालो आम्ही गर्दी टाळण्यास साडेचारलाच घराबाहेर पडलो होतो. आम्ही गणपतीची जी मूर्ती घेतो ती सर्वांत लहान, सर्वांत सुबक, सर्वांत कमी किमतीची घेतो. तुम्ही

विचाराल, हे सर्व एकदम आम्हाला कसं साधतं ? तर त्याची एक कथा आहे. एकदा एका संस्थानाचे महाकवी महाराजांबरोबर काश्मीरला गेले. तिथे महाराजांनी, त्यांच्या राण्यांनी आणि सरदारांनी उंची उंची शालू–शेले विकत घेतले. हजारा हजाराचे असे शालू–शेले घेऊन ते मुक्कामावर आले. तेथे ते परस्पराना दाखवीत असता त्यांनी महाकवीना त्यांनी काय घेतले म्हणून विचारले. तेव्हा महाकवींनी खांद्यावरची सुती हातमागाची चादर काढून त्यांच्यापुढे धरून एक सुंदर काव्य म्हटले. तेव्हा महाराज म्हणाले, ' कविराज ! तुमच्या या चद्दरीचा विलोभनीय रंग, त्यावरील हे सुंदर नक्षीकाम ! तुमची कलासक्त दृष्टी ! आम्हाला मत्सर वाटतो. कविराज ! हे आमचे हजाराहजाराचे शालू तुमच्या दहा रुपयाच्या चादरीपुढे शुद्र आहेत.' असे म्हणून महाराजांनी आपल्या अंगावरचा शालू महाकवींच्या खांद्यावर टाकला व महाकवींच्या हातातला शालू आपल्या खांद्यावर घेतला. या कथेवरून साध्या लहान गोष्टींत कसे हे कळले. सौंदर्य असते.

तेव्हा अशी ही सर्वांत सुबक, सर्वात लहान, सर्वांत कमी किमतीची मूर्ती शोधीत आम्ही नव्या विष्णूवरून शनिपाराकडे निघालो. बाजीराव रस्त्यावर मॅजेस्टिक बुक स्टॉल आहे त्या इमारतीतील बेहेरे आंबेवाले, नंतर डाव्या हातास पाटणकर खाऊवाले, नंतर देसाई आंबेवाले यांजकडे आणि शनिपार चौकाच्या कोपऱ्यावरून उजव्या हातास मंडईकडे वळले की दोन्ही हातांच्या अनेक दुकानात गणपतींच्या मूर्ती ठेवल्या होत्या. या सर्व दुकानांतील मूर्ती पहात पहात आम्ही पार तुळशीबागेच्या बोळात शिरून, गर्दीत धक्के खात दोन खेपा घातल्या. एकही मूर्ती पसंत न पडल्याने आम्ही परत बेहरे यांच्या दुकानातली एक मूर्ती आवडली होती ती घण्यास आलो. त्या मूर्ती विकल्या गेल्या होत्या. या वर्षी बेहरे यांच्या दुकानांतील मूर्ती सर्वांत सुंदर होत्या. त्या रत्नागिरीच्या आहेत म्हणून त्यांनी लिहिले होते. अगदी लहान मूर्तिपासून मोठ्या मूर्तिपर्यंत सर्व मूर्ती अत्यंत रेखीव, अत्यंत सुंदर, आणि प्रसन्न होत्या. आम्हाला आवडलेली मूर्ती आम्ही तेव्हाच घेतली असती तर बरे झाले असते असे वाटले.

असो. शेवटी आम्हाला एके ठिकाणी हवी तशी छोटी, सुंदर आणि स्वस्त मूर्ती मिळाली व ती घेऊन आनंदाने आम्ही घरी आलो. आम्ही गणपती आणतो तो मुलांसाठी आणतो, त्याची प्रतिष्ठापना करीत नाही. आमच्या मुलींना गणपतीचा उत्सव म्हणजे काय असते हे कळावे म्हणूनच आणतो. वाड्यातील इतर गणपतीपुढे मुले जाऊन आरत्या करतात तशा आमच्या गणपतीपुढेही करतात व रोज निराळा प्रसाद असतो. इतर गणपतींबरोबर आम्ही त्याचे विसर्जन करितो. या गणपतीच्या दिवसांतला सर्वांत आकर्षक भाग मला वाटत आला आहे तो देवे म्हणण्याचा. देवे म्हणताना घराचे छप्पर उडेल असा सूर आम्ही लावीत असू. आमचे एक चुलते होते त्यांना सर्वच उत्साह जास्त होता. त्यात सणांचा व गणपतीचा उत्साह आणखीच होता. हा गृहस्थ सणांवरच जगायचा. म्हणजे एक सण संपला की दुसऱ्या सणात तो उडी घ्यावयाचा. चातुर्मास म्हणजे त्याला आनंदच आनंद. मंगळागौरीपासून प्रत्येक सणाची तयारी घरातील बायांना करून देण्याचे काम त्याचे होते. फुले, पत्री वेल आणण्यापासून आम्ही त्याच्यामागे असू. गणपती आणताना तो मोठ्याने ' गणपतीबाप्पा मोरया ' ओरडावयाचा व आम्हाला ओरडावयास सांगावयाचा. त्याला लहान आवाज चालत नसे. गणपतीची आरासीची महिरप वगैरे करण्यास त्याच्या हाताखाली आम्ही एक एक आठवडा काम करावयाचो. देवे म्हणताना तो आम्हाला सारखा हाताने सूर वरवर चढवावयास सांगावयाचा. एकूण तो मोठ्ठा उत्सव व्हावयाचा. अनंत चतुर्दशी यावयाची. गणपती बुडवण्याचे तळे गावापासून फर्लांग दोन फर्लांगावर होते. वाटेत शेतं होती. शेतं त्या दिवसांत भाताने व पाण्याने भरलेली असत. म्हणून शेतांमधील उंच बांधावरून जावे लागे. चहूकडे हिरवेगार असे. बांधावरची निगडीची झुडुपे आणि गवत अगदी गळ्याशी येऊन गुदगुल्या करी. चटकन एखादा बेडूक पायाखालून पलीकडे शेतात उडी घेई. बेडकांचे डरॉंव डरॉंव चोहीकडून कानावर येई. दोन शेतामधील पाणी वाहून जाण्यास अधूनमधून दोन शेतांमधील बांधात खांड पाडलेली असे. तेथून वाहणाऱ्या पाण्याचा झुळझुळ आवाज वातावरणात मिसळून ऐकू येई. अशी एक खांड तळ्यावर जाण्याच्या वाटेवर होती व मोठे ओंडके टाकून पूल केलेला होता. तळ्यात गणपती बुडल्यावर आम्ही सर्वच उदास मनाने परतत असू. कुणी बोलत नसे. उत्सवाचा उत्साह ओसरलेला असे. सगळं हताश वाटे. आमच्यापेक्षा आमच्या चुलत्याचे तोंड उतरे. येताना परत ओंडक्यापाशी येईपर्यंत तो कसाबसा धीर धरी. मग हातातले तांब्याचे तबक आमच्या हातात देऊन ओंडक्यावर बसून डोळ्यांतले पाणी पुसे.

आता व्यक्तिशः अशी श्रद्धा राहिली आहे का ठाऊक नाही. एक कळते की आता व्यक्तींच्या देवाजवळ मागण्या वाढल्या आहेत. आपल्याला हवं ते आपण मिळवण्यापेक्षा किंवा आपले संकट आपण दूर करण्यापेक्षा देवाने ते करावे अशी अपेक्षा. ज्या हेतूने लो. टिळकांनी हा उत्सव सुरू केला त्याचेही आता सार्वजनिक क्षेत्रात काही उरले नाही. स्वातंत्र्य मिळाले. आता चहा, साखर किंवा विलायती कापड सोडण्याची जरूर नाही असे आम्ही गमतीने म्हणायचो. तसेच आता स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, राष्ट्रभक्ती, सेवा, त्याग याचीही आवश्यकता उरली नसावी.

आता थोडा उलटा प्रकार चालला आहे. परवा सकाळ-वर्तमानपत्रात वाचले त्यावरून मी हे म्हणतो. पूर्वी पृथ्वीवर कुणा मानवाने काही चांगले काम केले की इंद्रादिदेव वरून पुष्पवृष्टी करीत. आता मानवांनी वरून देवावर वृष्टी करण्याची प्रथा येणार असे परवाच्या त्या बातमीवरून दिसते. येथील दगडूशेट हलवाई गणपतीवर, हेलिकॉप्टरने आकाशातून पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. या दिवसात तीन तासात सहा वेळा ही वृष्टी करण्यात येणार असून, बारा जण ही वृष्टी करतील. त्यांच्याकडून प्रत्येकी हजार रुपये निधी घेण्यात येणार आहे. प्रत्येक वेळी दोघेदोघे पन्नास किलो वजनाची विविध फुलांची वृष्टी करतील.

बातमीत असेही आणखी होते की, या पुष्पवृष्टी करणारात प्रथम महापौरांचा समावेश होता; परंतु त्यांनी हा खर्च करण्यापेक्षा ही रक्कम ( एकूण साडेबारा हजार रुपये ) पूरग्रस्त फंडास द्यावी अशी विनंती केली. महापौर देवावर पुष्पवृष्टी करणाऱ्यात नाहीत असे दिसते. महापौरांच्या या निर्णयाबद्दल मीच काय पण असंख्य पुणेकर नागरिक महापौरांचे अभिनंदनच करतील यात शंका नाही.

असो ! आता घरोघरी गणराज स्थानापन्न झालेले आहेत. आता रोज सुप्रभाती रेडिओवरून गणपतिस्तोत्र, आरत्या, देवे ऐकू येऊन वातावरण प्रसन्न होत राहील. ' श्रीगणेशाय नमः 'चा धडा बाळपणी अक्षरे शिकण्याआधी आम्ही पाटीवर गिरविला होता. तेव्हा आम्ही चुकीचा उच्चार करीत असू. श्री गणेशायन मः आणि ओम्नामासीधं असे म्हणत असू. श्रीगणेशाय नमः असे गिरवून आम्ही गणपतीला नमस्कार करून शिक्षणास आरंभ करीत आहोत हे त्या वेळी कळत नव्हते; पण नंतर जेव्हा व्यासांनी आणि ज्ञानेश्वरांनीही आपल्या ग्रंथास आरंभ करताना श्रीगणपतये नमः असे लिहिलेले वाचले तेव्हा हे गणपतिप्रकरण साधे नाही हे लक्षात आले.

तेव्हा शेवटी सांगावयाचे म्हणजे, श्रीगणेशाय नमः म्हणून व ' गणपतिबाप्पा मोरया 'चा गजर करून मी वाचकांची दोन महिने सुट्टी घेत आहे व दिवाळी अंकाचे लिखाण पुरे करण्याचा यत्न करण्यासाठी ' संध्याकाळचे पुगे ' हे सदर दोन महिने बंद ठेवीत आहे. क्षमस्व– आता भेट दिवाळीत ! ☐

अफगाणिस्तानवरील लेखमाला

लेखिका
प्रतिभा रानडे, काबूल

# एक होती राणी

ऐन थंडीचे दिवस. काबूलमधला भल्या मोठ्या झरगोना पार्कवर थेट इथपासून तिथपर्यंत, बर्फाचा पांढराशुभ्र, चमचमणारा मखमली गालीचा अंथरलेला आहे. पाइनचे हिरवेगार वृक्ष आपल्या अंगाखांद्यांवरचं हिमवैभव मिरवीत ठसक्यात उभे आहेत. बाकीच्या निष्पर्ण झाडांच्या फांद्यांवरून ओघळणाऱ्या बर्फाच्या रेशीमधारांमधून असंख्य चिमुकली इंद्रधनुष्यं फाकत आहेत.

या सुंदर, रमणीय आलेखावर काळी रेघ ओढत नखशिखांत काळाभोर बुरखा घातलेल्या काही अफगाण बायका एकीपाठोपाठ एक अशा रांगेनं, एका बाजूनं आल्या आणि तिथंच असलेल्या कोपऱ्यावरच्या एका बैठ्या इमारतीमध्ये शिरल्या.

ते दृश्य पाहून मला अमृता शेरगीळच्या पेंटिंग्जची आठवण झाली. उदास, हुरहूर लावणारी, आर्त आणि तेवढीच उत्कट. त्या अफगाण बायका दिसेनाशा झाल्यावर मी माझ्या बरोबरच्या शहानाजला विचारलं, 'या कोण बायका ग, अशा कुठं गेल्या त्या ?'

खाली मान घालून आपल्या कोटावरचं बर्फ झाडत माझी मैत्रीण उडत उडत म्हणाली, 'कोण ? त्या बायका होय ? फतेरा पढण्यासाठी निघालेल्या दिसतात. ती बिल्डिंग म्हणजे बायकांचा फत्तेखाना आहे. त्यांच्या घरचं कोणीतरी मेलेलं दिसतंय. म्हणून निघाल्यात वाटतं फतेखान्यात.'

'बायकांना परवानगी आहे का फतेहा पढायची ?'

'हो. आहे की परवानगी; पण बायकांचा फतेखाना वेगळा असतो आणि तियला मुल्ला असतो तो एक तर साधारणपणे सत्तर-बहात्तर वर्षांच्या पुढचा असतो आणि त्यातूनही आंधळा. गंमतच आहे की नाही ? शाहनाजनं डोळे मिचकावीत विचारलं.

शाहनाज डोळे मिचकावीत हसत होती; पण मला काही हसू आलं नाही. उलट मी तर गंभीरच झाले. मेलेल्याच्या आत्म्यासाठी दुवा मागण्यासाठी बायकांना निराळ्याच फत्तेखान्यात जावं लागतं आणि तियला मुल्ला जख्खड म्हातारा आणि त्यातून आंधळा! पाच मिनिटं आम्ही दोघीही मुकाट्याने चालतच राहिलो. मग मी शाहनाजला विचारलं, "तुमच्या त्या अमीर अमानुल्लाला जर आणखी काही वर्ष राज्य करता आलं असतं, तर त्यानं आणि त्याची राणी सरय्या, या दोघांनी मिळून ही सगळी परिस्थिती पालटून टाकली असती नाही ? मग अफगाण बायकांना असं बुरखे घालून, निराळ्या फतेखान्यात जाऊन जख्ख म्हाताऱ्या, आंधळ्या मुल्लासमोर फतेहा पढावा लागला नसता. तुम्ही आज जगाच्या बरोबरीनं आला असतात!'

'सरय्यामुळं ? कुणास ठाऊक काय झालं असतं ते ! असा जर तरचा विचार करणं तर फार कठीण आहे. ज्याच्या त्याच्या नशिबाप्रमाणंच सगळं घडत असतं बघ !' स्वतः जगाबरोवर आलेली शाहनाज, उच्च वर्गीयांच्या खास उदासीनतेनं उत्तरली. सरय्याबद्दल तिनं दाखवलेल्या अनास्थेमुळं सरय्यापेक्षा मला तिचीच कीव आली. सरय्या–अमानुल्लाची खरी किंमत या बायकांना कळलीच नव्हती, की अलीकडच्या इतिहासातल्या व्यक्तींबद्दल आस्था न दाखवणं त्यांच्या एवढं रक्तातच मुरलं आहे ?

अफगाणिस्थानचा अमीर अमानुल्ला आणि त्याची राणी सरय्या यांनी १९१९ ते १९२९ या आपल्या औटघटकेच्या राज्यात अफगाणिस्थानात सर्वांगीण सुधारणा करण्यासाठी जंगजंग पछाडले. स्त्रियांच्या हक्कांसाठी, त्यांच्या शिक्षणासाठी, समाजात त्यांना योग्य ते सन्मानाचे स्थान मिळण्यासाठी झगडण्यामध्ये, लोकांचे मन वळवण्यामध्ये, सरय्याने सिंहाचा वाटा उचलला होता. अमानुल्लासारख्या आधुनिक विचारसरणीच्या राजाची ती बायको होती म्हणूनच केवळ तिनं ही जबाबदारी उचलली होती असं नसून, राणी व्हायच्या अगोदरपासूनच तिला ती दृष्टी होती. उलट स्वतः सरय्याचं व्यक्तित्व आणि तिच्या वडिलांनी तिला दिलेलं शिक्षण, त्यांच्या घरचं वातावरण, त्यांचे विचार या सगळ्यांनी भारावून जाऊनच, अमानुल्लाने सरय्याला मागणी घालून तिच्याशी लग्न केलं होतं. मुलामुलींनं एकमेकांच्या संमतीनं असं लग्न ठरवणं, ही गोष्ट त्या काळात अगदी एखाद्या परीकथेप्रमाणे अद्भुतच होती !


सरय्याचे वडील मोहम्मद बेग तरझी, हे आधुनिक विचारसरणीनं भारावून जाऊन, नवीन विचारांचा प्रसार करण्यासाठी सतत धडपडत होते. 'तरझी' हे नाव त्यांनी स्वतःच स्वीकारलं होतं. 'तरझी' चा अर्थ 'आधुनिक'. सर्वसामान्य लोकांना अत्याधुनिक शिक्षण, विशेषतः स्त्रियांना, मुस्लिमांमध्ये आधुनिक विचारप्रवाह, समाजसुधारणा या गोष्टींचा तरझींनी एवढा पुरस्कार केला होता की अमानुल्लाचा आजोबा अमीर अब्दूर रहमान यांनी तरझींना अफगाणिस्थानातून हद्दपार केले होते; पण त्यानंतर अमानुल्लाचे वडील अमीर हबीब–उल्ला यांचे राज्य सुरू झाल्यावर त्यांनी तरझींना पुन्हा अफगाणिस्थानात बोलावून घेतले. परत आल्यावर तरझींनी सिराज–अल्–अखबार हे स्वतंत्र वृत्तपत्र चालू केले. तरझी जेव्हा हद्दपार झाले होते तेव्हा ते सिरियामध्ये रहात होते. आटोमन साम्राज्यात राहिल्यामुळे त्यांच्या आधुनिक विचारांना आणखीनच धार चढली होती. साम्राज्यशाही, वसाहतवाद यांच्याविरुद्ध आणि

खास करून ब्रिटिशांना आपला कट्टर शत्रू मानणारे, कट्टर राष्ट्रवादी असल्यामुळे आणि 'अशिया हा अशियनांच्यासाठीच फक्त आहे,' या त्यांच्या मतामुळे त्यांच्याभोवती उत्साही अफगाण तरुण झटकन गोळा झाले. 'मुसलमानांनी जर आधुनिक विचारप्रवाह स्वीकारले नाहीत तर त्यांचा नाश अटळ आहे' अशी त्यांची दृढ निष्ठा होती. तरझींच्या काळात चार लग्नं करणं हे प्रतिष्ठेचं लक्षण मानलं जात असतानाही त्यांनी एकच लग्न केलं होतं. एवढंच नव्हे तर क्वाकाब आणि सरय्या या आपल्या दोघी मुलींना त्यांनी धर्मशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र यांचे धडे दिले होते. क्वाकाब ही त्यांची मोठी मुलगी तर त्यांच्या सेक्रेटरीचे काम करीत होती. 'सिराज–अल अखबार' ह्या वृत्तपत्राच्या कामकाजातही त्या दोघींची मदत व्हायची. इस्लामच्या कायद्यानुसार घराबाहेर त्यांना बुरखा घालूनच वावरावे लागायचे. तरीपण घरी मात्र कोणी परका आल्यावरही त्या पडदा पाळत नसत, चर्चा वादविवादात भाग घ्यायच्या. अमानुल्लाच्या मोठ्या भावाने क्वाकाबशी लग्न केले होते.

सरय्या दिसायला सुरेख होती. खास अफगाण स्त्रियांप्रमाणे नितळ, गुलाबी, गोरापान रंग होता तिचा. पातळ ओठ, धारदार नाक आणि ठाशीव हनुवटी यामुळे तिचा दृढनिश्चयी स्वभाव दिसत असे. बुद्धीची चमक काळ्याभोर नितळ डोळ्यात होती. पाश्चात्य पद्धतीचे तिचे आधुनिक कपडे अतिशय अभिरुचिपूर्ण असायचे. तरझींची कामं, सिराज–अल–अखबारची कामं ती अत्यंत चुटचुटीतपणानं करायची. सिराज–अल–अखबारमध्ये काम करण्यासाठी, तरझींशी वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करण्यासाठी अमानुल्ला नेहमी तरझींकडे जायचा. इतका की तो त्यांच्या घरातीलच एक होऊन गेला होता. तो रोज सरय्याला बघत होता. इतरांबरोबर तिच्याशी कोणत्याही विषयावर गप्पा मारत होता, महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करीत होता, वादविवाद करीत होता.

एक दिवस, इस्लामने कायद्यासंबंधीचे सगळे अधिकार मुल्लामौलवींच्या हातात सोपवले आहेत, ते आजच्या काळात कसे अनाठायी आहेत, या विषयावर किती तरी वेळ चर्चा रंगली होती. अमानुल्लाचे म्हणणे होते, कुराण लिहिले गेले तो काळ आणि आजचा काळ यामध्ये शेकडो वर्षांचा केवढा तरी फरक पडला आहे. त्यामुळे आजच्या जमान्यात घडणाऱ्या काही विशिष्ट गुन्ह्यांचा कुराणामध्ये– साधा उल्लेखही नाही. उदाहरणार्थ, सरकारविरुद्ध, राजाविरुद्ध, राज्यपद्धतीविरुद्ध गुन्हे करणाऱ्यांना मुल्ला काय शिक्षा देऊ शकतो? तो मग कुराणातला कायद्याचा, आपल्या अकलेप्रमाणे हवा तसा अर्थ लावून शिक्षा देणार. त्यापेक्षा अशा वेळी सरकारने नेमलेल्या अधिकाऱ्यांनीच, नवीन सुधारून केलेल्या कायद्यांप्रमाणेच तो न्यायनिवाडा करायला हवा.

'आणि वर्षानुवर्षे डोळ्यांना झापडं लावूनच कुराणाचं वाचन केल्यामुळं त्या मुल्लांना तरी कितपत शहाणपणा आलेला असतो कुणास ठाऊक?' सरय्यानं नेहमीप्रमाणेच हिरीरीनं चर्चेमध्ये भाग घेत म्हटलं, 'शेकडो वर्षांपूर्वी लिहून ठेवलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करताना, त्यांचा अर्थ लावताना, जर आजच्या काळाचं भान ठेवलं नाही तर ते कायदे म्हणजे तुरुंगच एक प्रकारचे. जग कुठं चाललं आहे आणि आपण मात्र अजून त्याच जुन्या रिंगणात फिरतो आहोत.'



**अमानुल्ला अमीर झाला तेव्हाचा सरय्या आणि अमानुल्लाचा फोटो १९१९ मधला. त्यावेळी स्त्रियांनी नखशिखांत बुरखा घातलाच पाहिजे, परक्या पुरुषासमोर जाता उपयोगाचे नाही असा इस्लामचा कायदा असताना सरय्याने पाश्चात्य कपडे घालून एका फोटोग्राफरकडून, नवऱ्याशेजारी उभी राहून फोटो काढून घेण्याचं धारिष्टच दाखवलं होतं!**

'आणि हे आमच्या लोकांना कळतही नाही ही केवढी दुःखाची गोष्ट आहे.' मोठा निश्वास टाकीत अमानुल्ला उद्गारला, 'आणि कोणी समजावून सांगायला लागलं तर तेही त्यांना पसंत पडत नाही.'

'म्हणूनच, म्हणूनच पुन्हा पुन्हा... पुन्हा पुन्हा... न दमता, निराश न होता, वाटेल तेवढे कष्ट घेऊन लोकांना ती गोष्ट सतत सांगितली पाहिजे. परत परत ठेचलं की मेलेल्या जनावरांचं जुनं मटणही मऊ पडतं. मग आपला तर जिवंत विचार करू शकणाऱ्या माणसांशी संबंध आहे. कधी त्यांना आंजारून–गोंजारून– समजावून सांगितलं पाहिजे, कधी युक्तिवाद केला पाहिजे, कधी धाक दाखवला पाहिजे– तर कधी जबरदस्तीनं कायदे करून त्यांना योग्य त्या मार्गावर आणलं पाहिजे. त्यासाठी त्या देशाचा राजा मात्र सुशिक्षित, समजतदार, कणखर असायला हवा. नाही तर त्या सगळ्या प्रयत्नां-

वर बोळा फिरण्याचीच शक्यता फार असते. ' अमानुल्लाच्या डोळ्यांत पहात तरझी म्हणाले.

अमानुल्लानं धीटपणानं तरझींच्या नजरेला नजर दिली. तो राजपुत्र होता तरी युवराज नव्हता. अमीर हबीब-उल्लानंतर अफगाणिस्तानच्या गादीवर हक्क सांगणारे– त्याचे दोघे सावत्रभाऊ होतेच. अमीर हबीबउल्लानंतर अफगाणिस्तानचं राज्य कोणाला मिळायचं ते अजून काहीच ठरलेलं नव्हतं. अर्थातच तसं काही अगोदरच ठरविण्याची पद्धतच नव्हती. तसं म्हटलं तर अफगाणिस्तानच्या संपूर्ण इतिहासात अमानुल्लाच्या आजोबांच्या वेळी, अब्दुर–रहमानच्या वेळीच अफगाणिस्तान हे एकसंध राष्ट्र म्हणून अस्तित्वात आलं होतं. अब्दुर रहमाननंतर प्रथमच काहीही रक्तपात न होता त्याचा मुलगा हबीबउल्ला हा अमीर झाला होता आणि त्याच्यानंतर कोण, हा प्रश्न त्याच्या जनानखान्यातच सोडवला जाण्याची दाट शक्यता होती. अमानुल्लाची आई, उल्ला हजरत ही अत्यंत धोरणी आणि जबरदस्त महत्त्वाकांक्षी बाई होती. तिचं माहेर एका नामवंत सरदार घराण्यातलं होतं. अमानुल्लानंच अमीर व्हावं म्हणून अगदी त्याच्या लहानपणापासूनच तिचे डावपेच सुरू होते. त्याचप्रमाणं अमानुल्लाला अमीर होण्यासाठी, राज्यकारभाराचं आवश्यक ते शिक्षण देण्यासाठी तिनं उत्तमोत्तम उस्ताद नेमले होते. जगात कुठं काय चाललं आहे याची खडान्‌खडा माहिती मिळण्याची तिची व्यवस्था चोख होती.

पण अजून अमीर हबीब-उल्ला जिवंत होता आणि अमानुल्लाच अमीर होणार हे निश्चित झालेलं नव्हतं.

तरझींच्या नजरेला नजर देत अमानुल्ला संथपणानं म्हणाला, ' राजा तर सुशिक्षित, समजूतदार, कणखर असायला हवाच, त्याबद्दल प्रश्नच नाही. तरी पण एक प्रश्न मला हल्ली फार सतावतो आहे. समाजसुधारणा आणायच्या, त्या राजाने सक्ती करून, कायदे करून आणायच्या की समाजानेच शिक्षणाच्या मार्गाने आणायच्या ? '

' राजानेच आणायच्या. सक्ती करून आणायच्या. कायदे करूनच आणायच्या. ' हाताची मूठ टेबलावर आपटत तरझी म्हणाले, ' समाज ? समाज म्हणजे तरी कोण ? सर्व सामान्य माणूसच ना ? तो तर महामूर्ख असतो. त्याला स्वतःचंच हित-अनहित कळत नाही. मेंढरांसारखा जिकडे ढकलावा तिकडे ढकलला जातो तो समाज. त्याला काय अक्कल असते ? म्हणून राजानेच या गोष्टी केल्या पाहिजेत. समाजाला त्या पटल्या तर ठीकच... नाही तर सक्ती करून सुद्धा त्या समाजाला सुधारायला हवं. ' तरझी नेहमीप्रमाणेच अत्यंत उत्तेजित होऊन तावातावाने बोलत होते.

' शिवाय जुने कायदेकानू, रूढी यांनी एका विशिष्ठ वर्गाला बहाल केलेले अधिकार तो वर्ग सुखासुखी सोडायला का म्हणून तयार होईल ? उलट हा वर्गच समाजसुधारणेच्या मार्गात अनंत अडथळे आणतो. ' जुनं ते सोनं ' असं म्हणून हेच लोक सर्वसाधारण लोकांना नवीन काही शिकू देत नाहीत, बाहेरच्या जगाशी त्यांची ओळखच होऊ देत नाहीत, त्यांची अस्मिताच जागी होऊ देत नाहीत. आमचं मुल्लामौलवीच काय; पण रूढींना घट्ट चिकटून बसलेले आमचे विनडोक पुरुष आणि स्वतःहून काही तरी करावं अशी मामुलीशीसुद्धा इच्छा नसलेल्या आमच्या मठ्ठ बायका– यांच्यामुळं आमचा देश असा बेडूक गिळलेल्या अजगरासारखा सुस्तावून पडला आहे. याला कोणी तरी एकदा गदगदा हलवायला हवं आहे. ' सरय्या तळमळून बोलत होती.

' शाब्बास, सरय्या... शाब्बास ! ... तू एखाद्या जमावापुढं भाषण चांगलं करू शकशील ! ' टाळ्या वाजवीत अमानुल्ला उत्साहानं उद्गारला.

' खरंच... अगदी खरंच... सरय्या, तू आता असं कर, आत्ता जे आपलं काही बोलणं झालं ते सगळं तू सुसंगतदारपणे, व्यवस्थितपणानं लिहून काढ ! तुला कुठले संदर्भ हवे असतील तर अमानुल्लाला विचार, मला विचार, मग तो लेख मी वाचून पाहीन, काही दुरुस्त्या करून हा लेख आपण सिराज–अल–अखबारमध्ये छापू या. या लेखाचं नाव असेल, ' या देशाला कोणी तरी गदगदा हलवायला हवं आहे; ' तरझी उत्साहाने म्हणाले,

' खरंच बाबा ! मी लिहूं ? खरंच लिहूं ? ' सरय्याचा आपल्या कानांवर विश्वासच बसेना.

' हो. लिही ना. पाहू या तरी कशी लिहितेस ते ! '

त्या दिवशी बऱ्याच उशीरा आपल्या राजवाड्यावर परतताना अमानुल्लाच्या मनात एक नवीनच विचाराची कळी उमलत होती. त्यामुळं कधी नव्हे एवढा अस्वस्थ झाला होता तो.

माझ्याशी लग्न करतेस का म्हणून सरय्याला विचारावं का ? ती ' हो ' म्हणेल का ? आत्तापर्यंत असं प्रत्यक्ष मुलानंच मुलीला लग्नाबद्दल कधीही विचारलेलं नव्हतं. दोन्ही घरच्या मोठ्या माणसांनी हे संबंध जुळवायचे असतात. ती प्रथा मोडायची ? ... इतर किती तरी प्रथा मोडायला निघालेला मी .. मी या वेळी असा का बरं घाबरतोय ?... सरय्या ' नाही ' म्हणेल अशी भीती वाटतेय का मला ?... हा प्रश्नच एवढा नाजुक आहे ..

दुसऱ्या दिवशी सकाळीच अमानुल्लानं आपल्या आईकडे–उल्या हजरतकडे–जाऊन हळूच सरय्याचा विषय काढला. त्या वेळी उल्याहजरत चांगलीच भडकली. शाही घराण्यातला मुलाच्या लग्नाची गोष्ट ही. आपला आपण निर्णय घेतोस ? सरय्याच्या मोठ्या वहिणीचं लग्न इनायतुल्लाशी लावलं त्याला राजकीय कारण होतं. हद्दपारीहून तिच्या बापाला तुझ्या बाबानं परत बोलावलं होतं ते स्वतःच्या फायद्यासाठी, त्याच्या स्वतःच्या काही योजना, काही विचार लोकांपर्यंत पोचवायला त्यांना तरझीसारखा माणूस हवा होता म्हणून. तरझीला लोकांत मान्यता मिळावी म्हणून त्याच्या मुलीशी आपल्या मुलाचं लग्न लावलं होतं आणि तेही मोठ्या माणसांच्या विचारानं; पण तू तर स्वतःचं लग्न स्वतःच ठरवायला निघाला आहेस. तरझीकडे जाताजाता तू फारच वाहवला आहेस. ते मला बिलकुल पसंत नाही. माझ्या दरबारातली तरुण मुलगी परिगुल मी तुला दिली नाही काय ? तिच्यापासून तुला मुलगाही झालेला आहे, आणि आता...'

' आई– तुला कळत कसं नाही ? मला आता लग्न करायचं आहे ! ' अमानुल्ला चिडून दातओठ खात बोलू लागला, ' माझ्या बापानंतर मीच अमीर व्हावं अशी तुझी इच्छा आहे ना ? त्यावेळी मग सरय्यासारखी शाह–खानम तको ? सुशिक्षित, सुंदर, कर्तृत्व-

वान, माझ्या विचारांशी संपूर्णपणे सहमत असलेली? अमीर झाल्यानंतर काय काय करायच्या माझ्या किती तरी योजना आहेत. त्या सगळ्यांमध्ये मला साथ देणारी बायको हवी आहे मला! निव्वळ माझ्या मुलांना जन्माला घालणारी बाई मला नको आहे!'

'साथ देणारी बायको? बायकोचं तिथं काय काम? घरातल्या कर्त्या पुरुषाच्या बायकोला एवढं महत्त्व कधी मिळायला लागलं आहे? तू अमीर होशील तो माझ्यामुळं .. आणि उद्या अमीर झाल्यावर तुला सल्ला-मसलत देणारी मी असेन तुझी! बायको नव्हे!...' उल्या हजरतच्या प्रचंड महत्त्वाकांक्षेला पहिला तडा आत्ताच गेला होता. सासू-सुनेचं पुढं पटणार नव्हतं, त्याची सुरुवात लग्नाच्या अगोदरच झाली होती.

आईशी भांडून-तंडून अमानुल्ला तणतणतच बाहेर पडला तो थेट तरझींकडे निघाला. उल्या हजरत काहीही म्हणाली असली तरी तो स्वतःच सरय्याला लग्नाबद्दल विचारणार होता. सरय्यासारखी बुद्धीवान, सुंदर, भावनोत्कट मुलगीच त्याला बायको म्हणून, उद्याच्या अफगाणिस्तानची शाह-खानम म्हणून हवी होती. कालच्या चर्चेच्या आधारावर आज तिनं लेख पुरा केला असेल. तरझींना वाचायला द्यायच्या अगोदर अमानुल्ला स्वतः तो लेख वाचून पहाणार होता. त्याच वेळी सरय्याला तो विचारणार होता—

अमानुल्ला तरझींच्या घरी पोहोचला तेव्हा सरय्या आपल्या भोवती कपड्यांच्या पेट्या घेऊन बसली होती. तिनं स्वतःसाठी नवीन फॅशनचे फ्रॉक्स, गाउन्स थेट पॅरिसहून मागवले होते. त्या कपड्यांच्या पेट्या उघडून ती बसली होती. अमानुल्लाला पहाताच तिला आनंद झाला. अतिशय उत्साहानं ती त्याला एक एक फ्रॉक, एक एक गाउन उलगडून दाखवू लागली. प्रत्येकाचं डिझाइन वेगळं, प्रत्येकाचं कापड वेगळं, प्रत्येकाचं वैशिष्ठ्य वेगळं ... सरय्या उत्साहानं त्याला सगळं समजावून सांगत होती.

अमानुल्लाला वाटलं चोवीस तासांपूर्वीच, कायदेकानू, समाजसुधारणा, शिक्षण याबद्दल तावातावानं बोलताना या देशाला कोणी तरी गदगदा हलवायला हवं आहे असं सांगणारी हीच ती सरय्या? कालच्या तिच्या त्या आवेशाचा आज मागमूसही हिच्यामध्ये आता दिसत नाही. आज एखाद्या मठ्ठ, सर्वसामान्य मुलीप्रमाणं फॅशनेबल कपड्यांच्यातच रंगून गेली आहे ही ...

अमानुल्लानं स्थिर नजरेनं सरय्याकडे पाहिलं. त्याच्या त्या थंड नजरेनं सरय्याच्या बोलण्याला, उत्साहाला एकदम अडसर बसला. हातातला गाउन तसाच उराशी धरून ती काहीही न बोलता जमिनीला खिळून उभी राहिली. आपल्या काळ्याभोर मोठमोठ्या डोळ्यांनी अमानुल्लाकडे पहातच राहिली. मग एकदमच तिला वाटलं, 'माझ्या कपड्यांचं त्याला कौतुक असायचं काय कारण? त्यापेक्षा त्याला माझ्या कालच्या लेखाबद्दलच उत्सुकता असणार. तो न दाखवता हा नसता फालतूपणा मी करायला लागले म्हणूनच तो असा रागावला असणार.'

तिनं हातातला गाउन खाली ठेवला आणि पाठ वळवून ती तो लेख आणण्यासाठी वळली.

'थांब सरय्या ... कुठं निघालीस?' अमानुल्लानं विचारलं.

'आलेच ... कालचे कागद घेऊन येते.'

'हे बघ... जरा इकडे ये...'

सरय्या खाली मान वळवून उभी राहिली.

'सरय्या तू माझ्याशी ... लग्न करशील? मला करायचं आहे तुझ्याशी लग्न...' अमानुल्ला घाईघाईनं बोलून गेला.

सरय्या अवाक् होऊन, विस्फारल्या डोळ्यांनी त्याच्याकडे पहातच राहिली. आज अमानुल्लाचा मूड ठीक नाही हे मगाशीच तिच्या लक्षात आलं होतं... पण हे काय?

सरय्या काहीच बोलत नाहीसं पाहून त्यानं पुन्हा विचारलं, 'सांग सरय्या, करशील माझ्याशी लग्न?'

'मी... मला ... मला काहीच कळत नाही... मला भीती वाटतेय...'

'घाबरू नकोस सरय्या... माझ्या आईबाबांची इच्छा असली, नसली तरी मला तुझ्याशीच लग्न करण्याची इच्छा आहे. तरझींचीही त्याला काही हरकत असेल असं वाटत नाही; पण तुझी इच्छा आहे ना?' सरय्याच्या केसांना हळुवारपणानं स्पर्श करीत अमानुल्लानं अतिशय नाजूकपणानं विचारलं.

भानावर येऊन दोन्ही हातांच्या ओंजळीत आपला चेहरा लपवीत ती तिथून पळून गेली.

अमानुल्ला स्वतःशीच मंदसं हसला आणि लगेच तरझींकडे गेला. गेल्या गेल्या त्यानं सरळच विचारलं, 'सरय्याशी लग्न करण्याची माझी इच्छा आहे. मी तिला विचारलं, तिची हरकत नाही. तुमची परवानगी आहे का?'

तरझी क्षणभर अमानुल्लाच्या चेहऱ्याकडे पहातच राहिले. असं काही होईल अशी अगदी अंधुकशी कल्पना त्यांना मधूनच येऊन जायची; पण ज्या अनपेक्षितपणानं अमानुल्लानं त्यांना विचारलं होतं, त्यामुळं ते बावरून गेले होते; पण लगेच स्वतःला सावरून त्यांनी विचारलं, 'उल्या हजरत... तुझी आई, तिची संमती आहे का?'

'लग्न मला करायचं आहे. माझ्या आईला नव्हे. ही निवड माझी आहे.'

'लग्नाबद्दलचे माझे विचार तुला माहीतच आहेत, अमानुल्ला. उद्या तू अमीर झालास की...'

'सरय्या मला आवडते म्हणून राजीखुशीनं मी तिला लग्नासाठी मागणी घातली आहे. तुम्हाला ज्या गोष्टीची भीती वाटतेय त्याबद्दल मी वचन देतो. दुसरं लग्न मी करणार नाही, कधीच...गुलपरी ... माझी बायको नसली तरी मी तिला भरपूर पोटगी देऊन तिची पाठवणी करणार आहे.'

'ठीक आहे तर मग ... सुखानं संसार करा. मुला-नातवंडांचं समृद्धीचं, भरपूर आयुष्य लाभू दे तुम्हाला.' तरझी गदगदून म्हणाले. घसा किंचितसा खाकरून पुढं म्हणाले, 'कदाचित तुम्हा दोघांच्या हातूनच अल्लाला या देशामध्ये ऊर्जितावस्था आणायची असेल.' ◘

१९१९ मध्ये अमीर हबिब-उल्ला शिकारीला गेला असताना, जलालाबाद इथं कोणी तरी त्याचा खून केला. या खुनापाठीमागं कोणाचा हात होता ते शेवटपर्यंत उघडकीला आलं नाही किंवा आणलं गेलं नाही असंही म्हणता येईल. तरीपण उल्या हजरत आणि

अमानुल्ला यांचा त्या खुनाशी संबंध असावा अशा अफवा पसरल्या होत्या.

खून झाला तेव्हा अमानुल्ला स्वत: काबूलमध्येच होता. हबीब-उल्ला मेल्यावर अमानुल्लानं घाईघाईनं स्वत:कडे 'अमीर'पणा घेऊन आपले राज्य सुरू केलं.

आतापर्यंत तरुणांकडे चर्चा, वादविवाद यातूनच ज्या योजना आखल्या होत्या, सिराज-अल-अखबारमधून ज्या विचारांचा पुरस्कार सतत चालला होता त्या योजना, ते विचार आता अमलात येऊ लागले. हळूहळू जुनाटपणाचं घोंगडं फेकून देण्याच्या क्रियेची सुरुवात झाली. काबूलमध्ये मुलींच्यासाठी शाळा निघाल्या; गुन्हेगारांचा निवाडा मुल्लामौलवींसमोर न होता, सरकारने नेमलेल्या न्यायाधिशांसमोर होऊ लागला. शिपायांचे पगार वाढले, मुल्लामौलवींच्या सरकारांतून मिळणाऱ्या पगारात कपात झाली, मुलांच्या तंत्रविद्येसाठी-शाळा निघाल्या, सुटसुटीत असे पाश्चात्य पद्धतीचे कपडेच घालावेत असं लोकांना सांगण्यात येऊ लागलं. बायकांनी बुरखा घालू नये, पडदा पाळू नये असं अत्यंत आग्रहानं सांगण्यात येऊ लागलं. कोणत्याही मुलीचं लग्न जबरदस्तीनं होऊ नये यासंबंधी कायदे केले; गुलामी, वेठबिगारी कायद्यानं बंद केली, सिनेमा-नाटकं अफगाणिस्तानात सुरू झाली; वृत्तपत्रांच्या संख्येत भरपूर वाढ झाली. पुरातत्त्वविभाग सुरू होऊन, फ्रेंच पुरातत्त्ववेत्त्यांना अफगाणिस्थानात काम सुरू करण्याची परवानगी मिळाली; अफगाणिस्थानातील पहिली घटना अस्तित्वात आली; नागरीहक्क अफगाण लोकांना देण्यात आले; किती तरी युरोपियन आणि आशियाई देशांशी प्रथमच स्वतंत्रपणाने संबंध प्रस्थापित करण्यात आले. सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, मुलकी वगैरे प्रत्येक क्षेत्रात जगाबरोबर येण्याचे प्रयत्न नेटाने सुरू झाले.

सरय्या आता मुलींच्या शाळेतल्या समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवू लागली. मुलींच्या समोर ती स्त्रीशिक्षणाचे विचार मांडू लागली. अशा समारंभांना ती काबूलमधल्या परदेशी वकिलातीतील अधिकाऱ्यांच्या बायकांनाही बोलवीत असे. त्या बायकाही उत्साहाने या समारंभाना यायच्या; पण त्याचे खरे कारण अफगाण मुलींच्या शिक्षणामध्ये त्यांना काही स्वारस्य होते असे नसून सरय्याचे दर वेळचे नवे नवे, अत्याधुनिक फॅशनचे कपडे पाहाण्याचे त्यांना जास्त आकर्षण होते. समारंभाला जाऊन आल्यावर मग सरय्याच्या कपड्यांची त्या बायकांच्या वर्तुळात बरीच चर्चा व्हायची.

युरोपमधून पुरुष डॉक्टरांच्या बरोबरीनं काही स्त्री डॉक्टरांनाही मुद्दामहून बोलावण्यात आलं. फ्रॉलिन लेट ही जर्मन डॉक्टर आणि सिनोर टान्झी ही इटालियन डॉक्टर यांच्या मदतीनं सरय्यानं—अफगाणिस्थानात स्त्रियांसाठी पहिलं हॉस्पिटल स्थापन केलं. मुलींना लोकांनी मोठ्या संख्येनं—शाळेत पाठवावं म्हणून सरय्याचा सतत प्रचार सुरू होता; पण त्यामुळं कंदाहार, मजारे, शरीफ, गझनी. जलालाबाद वगैरे ठिकाणच्या लोकांना भीती वाटू लागली की आज नाही उद्या आम्हालाही आमच्या मुलींना शिक्षणासाठी सक्तीने थेट काबूलपर्यंत पाठवावं लागणार की काय ?

१९१९ मध्ये अमानुल्ला राजा झाला आणि १९२४ मध्ये अफगाणिस्थानातल्या खोस्त भागातल्या टोळीवाल्यांनी अमानुल्लाविरुद्ध बंड केले. हे बंड मुल्लामौलवींनीच चिथावल्यामुळं झालं होतं. काबूलमध्ये झालेल्या सुधारणांचा डोंगरदऱ्यांमध्ये रहाणाऱ्या टोळीवाल्यांवर काहीच बरावाईट परिणाम झाला नव्हता; पण अमानुल्ला इस्लामविरुद्ध उठला आहे असं तिथल्या मुल्लांनी चिथावल्यामुळं 'काफर' अमानुल्लाविरुद्ध बंड करण्याचे कोलितच त्यांच्या हातात दिले गेले; पण अमानुल्लानं हे बंड आपल्या सामर्थ्यानं, आपल्या स्वामीनिष्ठ शिपायांच्यामुळं मोडून काढले. १९२२ मध्ये तिसरे अँग्लो-अफगाण युद्ध जिंकून अमानुल्लाने ब्रिटिशांची सत्ता झुगारून दिली होती. आता टोळीवाल्याचे बंड मोडून त्याने आपली अंतर्गत सत्ता बळकट केली. आपल्या विजयी सैनिकांच्या सन्मानार्थ त्यानं एक मोठा समारंभ केला त्या समारंभाला उल्या हजरत आणि सरय्या या दोघीही उपस्थित राहिल्या होत्या. अफगाणिस्थानातल्या इतिहासात आतापर्यंत सैनिकांसमोर शाही घराण्यातली-कुठलीच बाई कधीच गेली नव्हती ! उमा हजरत आणि सरय्यानी यांनी रिवाजाप्रमाणे नखशिखांत बुरखा घातला नव्हता. त्यांचे चेहरेच फक्त तेवढे डोक्यावरल्या हॅटला लावलेल्या जाड कापडाने झाकले गेले होते. त्यांच्या हातून रुमालात बांधलेली सोन्याची नाणी घेताना अफगाण सैनिकांनी प्रथमच शाही घराण्यातल्या बायकांचे पाय कसे दिसतात ते पाहिले. पाश्चात्य स्त्रियांचे कपडे कसे दिसतात ते पाहिले. त्यांच्या हातून सोन्याची नाणी घेताना, त्यांनी रिवाजाप्रमाणे नखशिखांत बुरखे घेतलेले नाहीत या गोष्टीला त्यांनी काहीच महत्त्व दिलं नाही.

बंडात भाग घेण्याऱ्या मंगल, झरदान, खिलजी टोळीवाल्यांच्या बायकाची सरय्यांने एक सभा घेतली. त्या बायकांना तिनं सांगितलं, 'अमीर विरुद्ध असं बंड करणं हा भयंकर गुन्हा आहे ! त्यांच्या नवऱ्यांनी हा गुन्हा केला; पण त्याची अर्धी जबाबदारी त्यांच्या बायकांचीसुद्धा आहे. कारण बायकांनी सांगितलं असतं तर पुरुषांनी बंड केलं नसतं. अशा भयंकर गुन्ह्याला देहान्ताचीच शिक्षा योग्य ! त्या मानानं त्यांना फक्त तुरुंगातच टाकलं ही शिक्षा अतिशय सौम्य आहे; पण पुन्हा जर अशातऱ्हेचा बंडाचा प्रयत्न कोणीही केला तर मात्र प्रत्येक पुरुषाला व प्रत्येक बाईला मारून टाकण्यात येईल !'

बंडाचा बीमोड केल्यानंतर अमानुल्लाने 'ज्ञान आणि अज्ञान स्तंभ' उभारून आपल्या विजयाची स्मृती कायम ठेवली. त्या स्तंभाच्या एका बाजूला बंडाच्या बीमोडाची हकीगत आणि तीन बाजूंना त्या लढाईत मरण पावलेल्या शिपायांची नावं सोन्याच्या तारेनं लिहून ठेवली होती. या समारंभासाठी अमानुल्ला आपल्या रुपेरी रोल्सराइस गाडीतून, सरय्याला बरोबर घेऊन रस्त्यावरून मिरवीत गेला होता. आजही सरय्यानं नेहमीप्रमाणेच जाड बुरखा हॅटला लावला होता. त्यांच्या गाडीच्या पाठोपाठ दुसऱ्या गाडीतून सरय्याच्या दोन तरुण मुली येत होत्या, उजळ माथ्यानं ! कसलाही बुरखा न घेता ! अफगाणिस्थानात हे काही तरी अघटितच होतं ! मुलगी दहा-बारा वर्षांची झाली की, ती बुरख्यात गेलीच पाहिजे असा जियला दंडक होता, तिथं खुद्द राजकन्याच बुरख्याशिवाय रस्त्यातून मिरवीत जात होत्या ! दुतर्फा उभे राहिलेले लोक टकाटका बघतच राहिले आणि हे लोक समारंभानंतर जेव्हा आपापल्या गावात, दूरदूर गेले तेव्हा दबत्या आवाजात एकमेकांना सांगू

लागले, 'त्या तिकडे काबूलमध्ये शाही मुली बुरखा तर घालीतच नाहीत आणि खुद्द शाह-खानमसुद्धा फक्त चेहऱ्यावरूनच तेवढा बुरखा घेते. फिरंग्यांचे कपडे घालते, पाय उघडे टाकते!'

तरी पण या सगळ्या गोष्टी तिकडे दूर काबूलमध्ये घडत होत्या. खेडेगावातून, डोंगरदऱ्यांमधून राहणाऱ्या टोळीवाल्यांना त्याचं काही फारसं सोयरसुतक नव्हतं. त्यांच्या रोजच्या आयुष्यात त्यामुळं काहीच फरक पडत नव्हता; पण सरय्याचं नाव मात्र या ना त्या निमित्तानं पुन्हापुन्हा कानांवर पडत होतं. ती बाई चक्क आपल्या नवऱ्याच्या खांद्याला खांदा लावून हिंडत-फिरत होती, सैनिकांना बक्षिसं देत होती, बायकांना दवापाणी देण्यासाठी दवाखाने काढत होती, मुलांना कसं वाढवावं ते सांगत होती, मुलांना शाळेत पाठवा म्हणत होती, फिरंगी कपडे घाला म्हणत होती. ... हे मात्र काही तरी वेगळंच घडत होतं!

सरय्या आता मुलींसमोर, बायकांसमोर का होईना पण वारंवार भाषणं देऊ लागली होती; पण तिला 'र' म्हणता यायचं नाही. त्याऐवजी ती 'ल' म्हणायची. तेव्हा मग अमानुल्लाने तरझींना सांगितलं, 'तिच्या भाषणातला प्रत्येक 'र'चे 'ल' करून द्या किंवा 'र' संपूर्णपणे टाळूनच तिचे भाषण लिहून द्या! प्रत्येक 'र' काढून टाकण्यासाठी मी तुम्हाला एक सोन्याचं नाणं देईन!'

तरझींनी दोन तासांत सरय्याच्या भाषणातले सगळे 'र' काढून टाकले. अमानुल्लाने दिलेली सोन्याची नाणी खिशात टाकत तरझी सरय्याकडे पाहत अमानुल्लाला म्हणाले, 'प्रत्येक 'र'साठी एक सोन्याचं नाणं, म्हणजे माझा तर फायदा झाला, प्रश्नच नाही; पण हे सगळंच प्रकरण जरा महागडंच नाही काय?'

अमानुल्ला म्हणाला, 'महागडं तर आहेच; पण सरय्याचा प्रत्येक शब्द हासुद्धा सोन्याच्या मोलाचाच आहे! माझ्या बरोबरीनं समाजसुधारणेचं काम ती करते आहे. मी कायदे केले तरी ते घरोघरी पोचवण्याचं काम सरय्याच करते आहे. तिच्यामुळंच माझ्या इच्छा-आकांक्षा वेगानं पूर्ण होतील. ... म्हणूनच तिच्या शब्दाला सोन्याचं मोल आहे. आताच नाही; पण जोपर्यंत सरय्या भाषणं देईल, तोपर्यंत शब्दबदलाचं तुमचं काम चालू ठेवा, मी माझं पैसे देण्याचं काम करीन!'

तरझी, सरय्या भारावून पाहतच राहिले! मान हलवीत तरझी म्हणाले, 'मला फार बरं वाटलं! अमानुल्ला, तू तर माझ्याही पुढं गेलास रे! मी माझ्या मुलींना फक्त शिकवलं. तू मात्र स्वतःच्या मुलींना शिकवलंसही आणि बुरखा न घालता रस्त्यावरून घेऊन गेलास! टीचभर बुरखा घालून का होईना; पण आपल्या बायकोला बरोबरीनं घेऊन हिंडतोस. हिंमतवान आहेस. शाबास आहे तुझी!'

अमानुल्लानं खुशीनं दोन्ही हात पसरून हसत हसत सरय्याकडं पाहिलं.

□

अमीर अमानुल्ला जेव्हा परकीय वकिलातीतील अधिकाऱ्यांना मेजवानीसाठी बोलवायचा त्या वेळी सरय्या त्या अधिकाऱ्यांच्या बायकांनाही मेजवानीसाठी बोलवायची. त्या वेळी काबूलमधील प्रतिष्ठित अफगाण लोकांच्या बायकांनाही आमंत्रणं द्यायची. पूर्वी उल्ला हजरतराणी असताना ती सुद्धा अशा 'पडदा पार्टीज्' द्यायची; पण त्या वेळी निमंत्रित बायका उल्ला हजरतच्या हाताचा मुका घेऊन मग नंतर फालतू गप्पा मारीत बसायच्या. सरय्या मात्र सुरुवातीचा नेहमीप्रमाणे ओळखीचा, स्वागताचा, कार्यक्रम झाला की, युरोपिअन बायकांना स्वतःच्या कामाबद्दल माहिती द्यायची, त्यांच्या देशातून कुठेकुठे कायकाय प्रयत्न चालू आहेत त्याबद्दल माहिती विचारून घ्यायची. त्यांचे रीतीरिवाज, पद्धती, स्त्रीगीतं याबद्दल माहिती विचारायची.

अशाच एका पार्टीच्या वेळी, युरोपिअन स्त्रियांना अफगाणिस्थानातले 'अत्तान' हे स्त्रियांचे लोकनृत्य दाखवणे सुरू होते. 'अत्तान' मध्ये खुद्द सरय्यानंही भाग घेतला होता. एका जाड





**लेखक : पु. ल. इनामदार मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

पड्यामागं टमटम, रबाब वगैरे अफगाणवाद्यं वाजवीत वाद्यवृंद बसला होता. 'अत्तान' संपल्यानंतर सरय्यानं आपल्या युरोपिअन पाहुण्यांना त्यांचा एखादा नाच दाखवण्याची विनंती केली; पण कुठल्या तरी अनोळखी सुरांच्या त्या अफगाण वाद्यवृंदावर त्यांना कोणताच नाच करता येईना आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुरुष माणसं नसताना फक्त बायकाबायकांनीच नाच करणं त्यांना ऐकून सुद्धा माहीत नव्हतं! त्या युरोपिअन बायकांना पुरुषांच्या बरोबरीनं, त्यांच्या हातात हात घालूनच फक्त नाचता येत होतं! सरय्याला केवढं तरी नवलंच वाटलं त्या गोष्टीचं!

अशाच एका मेजवानीच्या वेळी अमानुल्ला सरय्याला तिच्या कामगिरीबद्दल, आतापर्यंत कोणत्याही बाईला न मिळालेला असा अफगाणिस्थानातला उच्च दर्जाचा पुरस्कार देणार होता. त्या पार्टीला जमलेल्या सगळ्या बायका युरोपिअनच होत्या. त्यामध्ये तुर्कस्थानच्या एका मिनिस्टरची बायको पण होती. अमानुल्ला तिथे येणार म्हटल्यावर, आपल्या निकटच्या कुटुंबाबाहेरील एका पुरुषासमोर आपण कसं जायचं, म्हणून ती बाई तिथून निघून जाऊ लागली. सरय्यानं तिला खूप समजावलं. खुद्द तुर्कस्थानमध्ये कमालपाशा बुरखा काढून टाकण्याचे, पडदा न पाळण्यासाठी प्रयत्न करीत होता; पण जुन्या वळणाच्या त्या बाईला काही ते पटेना. शेवटी अमानुल्ला तिथं येण्याअगोदरच त्या बाईला तिथून निघून जाण्याची परवानगी देण्यात आली.

ही हकीगत कळल्यावर अमानुल्ला चिडला, संतापला, दुःखी झाला, निराश झाला, तो सरय्याला म्हणाला, 'तुम्हा बायकांना अक्कल कधी येणार कोणास ठाऊक? तुर्कस्तानमध्ये खुद्द कमालपाशा पड्याविरुद्ध प्रचार करतो आहे. आणि त्याच्याच मिनिस्टरच्या बायकोला पडदा न पाळण्याचं धारिष्टच होऊ नये? काय उपयोग आहे मग आमच्यासारख्यांच्या खटपटीचा? मला तर एखादे वेळी वाटतं की, जन्मभर पड्यातच रहाण्याची, तसंच अंधारातच मरून जाण्याची या महामूर्ख बायकांचीच इच्छा असते! ते काही नाही, आता यांच्यावर कायदे लादूनच त्यांना त्या अंधारातून बाहेर काढलं पाहिजे!'

समारंभानंतर अमानुल्ला आणि सरय्या आपल्या राजवाड्याच्या गच्चीमध्ये खुर्च्या टाकून बसले होते. सर्वदूर संध्याकाळनंतरचा नितळ अंधार पसरला होता. कुठं तरी एखादा बारीकसा दिवा मिणमिणत होता. त्या अंधाराकडे हात दाखवून सरय्या म्हणाली, 'या काबूल शहरात ... त्याच्या पलीकडे दूरवर, डोंगरावर, दऱ्यांमध्ये दीड-दोन पुरुष उंचीच्या भिंतींनी वेढलेल्या घरातल्या आपापल्या अंधाऱ्या कोपऱ्यात असंख्य अफगाण बायका आपलं जीवन मुकाट्यानं, विनातक्रार ढकलीत आहेत. एखाद्या निर्जीव वस्तूसारखी बायकांची बुरख्यामध्ये गाठोडी बांधून ठेवली जातात ... त्यातून बाहेर पडण्याची इच्छा निर्माण करणं हेच आपलं पहिलं काम आहे! कुणी एखादी मिनिस्टरची बायको झाली, एखादी राजाची राणी झाली तरी पिढ्यांन्‌पिढ्यांच्या संस्कारांचं एवढं प्रचंड ओझं त्यांच्या मनावर असतं की, सहजासहजी त्यातून बाहेर यावसं वाटणं फार अवघड आहे! बुरख्याबाहेरच्या जगाची त्यांना ओळख करून दिली पाहिजे. त्या जगाचं मनस्वी आकर्षण त्यांच्या मनात निर्माण झालं पाहिजे. इस्लामनं सांगितलेल्या पापपुण्याच्या ज्या खऱ्या आहेत त्याच कल्पना त्यांना सांगितल्या पाहिजेत! ज्ञानाची लालसा, स्वातंत्र्याची ऊर्मी, ते मिळवण्यासाठी लागणारं धारिष्टच त्यांच्या मनात निर्माण करणं हे पहिलं काम! ते झालं की मग त्यांची एवढी मोठी शक्ती निर्माण होईल की मग कायदे करायचे ते फक्त त्यांना संरक्षण देण्यासाठी, त्यांना आणखी बळकटी आणण्यासाठी!'

'छान बोलतेस तू सरय्या! तुझे हे सगळे विचार तू लिहून काढ! तो लेख आपण अखबारमध्ये छापू या म्हणजे तुझे विचार लोकांपर्यंत पोचतील ... तरीपण ... माझी खात्रीच आहे की कायदे केल्याशिवाय सुधारणांची अपेक्षा ठेवली तर त्या सुधारणा येण्यासाठी कित्येक वर्षं थांबावं लागेल! एखादा माणूस चिखलात रुतलेला असतो, त्याला कोणी तरी मुद्दामहून ओढून बाहेर काढल्याशिवाय त्याला नुसत्या मनाच्या इच्छेमुळंच फक्त कसं बाहेर येता येईल? आणि मुद्दामहून बाहेर काढल्याशिवाय चिखलाबाहेरचं स्वच्छ, मोकळं जग कसं असतं ते त्याला कळणार तरी कसं? म्हणून थोडीशी जबरदस्ती, कायदे हे हवेतच!...'

## एक होती राणी : उत्तरार्ध पुढील अंकी

# पुस्तके

अरुण खोरे

# आत्मपरीक्षण करणारी डांगळे यांची कथा

**'बांधावरची माणसं'**

'मी स्पष्ट सांगतो की, निराश नाही रे प्रश्नांच्या घेराओतून मुक्त झालेला मी. आकाशव्यापी भडकलेल्या ज्वाळा-वेदनारहित मी. मी स्पष्ट सांगतो मी निराश नाही रे एक उजळ-शिल्पित स्वप्न पाहतोय रे मी.'

इतक्या स्पष्टपणे, ठामपणे गेल्या वर्षी सांगणारे कवी अर्जुन डांगळे या वर्षी ही बांधावरची माणसं रेखाटताना मात्र प्रश्नांच्या घेराओतच अडकले आहेत असं वाटत राहातं. अर्थात ज्या जीवनाचं सम्यक् दर्शन त्यांना यातून घडवायचं आहे, त्या जीवनाची वाट, तिथली माणसं यांना आपल्या समाज-व्यवस्थेत अशीच एक जागा दिलेली आहे की, डांगळे पुनःपुनः प्रश्नांच्या घेराओत पकडले जावोत!

अशा प्रश्नांच्या घेराओत अडकून उत्तराचा शोध घेणारं प्रतिभाशाली दलित कलावंतांचं मन गेल्या दोन दशकात मनातल्या धुमसत्या विचार-भावनांना आविष्कृत करू लागलं आहे. या दशकात दलितांच्या उत्थानाचं व्रत घेतलेली विद्रोही कविता ज्वालामुखीच्या तप्त धारेसारखी मराठी साहित्य-भूमीवर उसळून आली आहे! तर दलितकथेनं गेल्या दशकात बाबुराव बागुलांच्या समर्थ लेखणीतून स्वतःचं आविष्करण घडवलं. या प्रखर आणि समर्थ लेखणीशी अर्जुन डांगळे यांची कथा आपलं नातं जोडू इच्छिते. ही कथा आंबेडकरांनी सजवलेल्या तत्त्वज्ञानाची भाष्य होते, 'ब्राह्मण नाही, हिंदुही नाही, न मी एक पंथाचा' असा घोष करणाऱ्या केशवसुतांची परंपरा सांगते आणि म्हणूनच ती आपल्याला अनुत्तरित करणाऱ्या वैचारिक संघर्षाला जन्म देते.

अलीकडच्या काळात दलितांच्या व्यासपीठावरही प्रतिभावंतांचा मेळा भरू लागला आहे. मराठी साहित्याची नोंद घेताना मला या दलित साहित्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष झालेले आहे ही गोष्ट खटकते. साहित्याला कलामूल्याचे निकष असावेत, जातिधर्माचे नसावेत असे उच्चरवाने सांगणाऱ्या मायमराठीच्या थोर-थोर समीक्षकांनी शोषित समाजाचा वैराण अनुभव व्यक्तविणाऱ्या प्रतिभेच्या उन्मेषांकडे मात्र ढुंकूनही बघितले नाही. ही खंत डांगळचांच्या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत या दलित-साहित्याचे प्रमुख भाष्यकार डॉ. भालचंद्र फडके यांनी जाणीवपूर्वक व्यक्तविली आहे. डॉ. फडके म्हणतात– 'अनेक दलित लेखकांनी नव्या जाणिवेचे दर्शन घडविणारी कथा लिहिली; पण 'आजच्या घडीची मराठी कथा' याविषयी मुक्तसंवाद करणाऱ्या गाडगीळ व राजाध्यक्षांना 'दलितकथेबद्दल' बोलावे असे वाटले नाही. या मुक्तसंवादात चर्चा करण्याचा अनेक लेखकांचा उत्साह चांगला होता. मग हा 'संवाद' बागुलादी लेखकांच्या कथांविषयी उदास का?'

एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे व ती म्हणजे दलितलेखकांनी–कवींनी लिहिलेलं वाङ्मय हा त्या घडीचा, त्या क्षणाचा केवळ भावनिक आविष्कारच केवळ नव्हता, तर त्यामधे वैचारिक बैठकही होती.

सर्वसाधारण जीवनाला भेदणारे असे अनेक अनुभव केवळ दोन-चार शब्द मांडता येतात म्हणून हे वाङ्मय निर्माण झालेले नाही. तत्त्वज्ञानाची बैठक, विचारांची पक्की मोट बांधूनच हे आविष्कार कथा-कवितेच्या रूपातून प्रगटले आहेत.

बाबुराव बागुलांनी 'जेव्हा मी जात चोरली होती' या आपल्या कथासंग्रहात लिहिताना स्पष्टच म्हटलं आहे– "दलित साहित्यातील 'दलित' ही वैचारिकता आहे. कलासाहित्याकडे बघण्याचा आणि ते निर्माण करण्याचा तो दृष्टिकोन आहे. हा दृष्टिकोन कोणीही स्वीकारू शकतो. त्याला जातीचे, आर्थिक स्थितीचे प्रमाणपत्र लागत नाही. विचार, हृदय हे ते प्रमाणपत्र असावे लागते."

बागुलांनी आखून दिलेल्या या मार्गावर दलितसाहित्याने गेली दोन दशके आपल्या पाऊलखुणा उमटवल्या आहेत. त्या वेळी बागुलांनी आपल्या या वाङ्मयाचा कथा-कादंबऱ्यांचा-कवितेचा जो नायक उभा केला होता; तोच आजही उभा आहे. कारण आपल्या व्यवस्थेने त्यांनी या नायकाचे अस्तित्व अबाधित ठेवण्याची अलिखित प्रतिज्ञाच केली आहे जणू!

बागुलांचा तो नायक कसा होता? बागुल त्या प्रस्तावनेच्या शेवटी लिहितात–

'मला गाणी गाता येतात विषमतेच्या निषेधाची आणि त्याच्या पुरस्काराची. तो ज्याला वर्णव्यवस्थेने तुच्छ, तिरस्कृत ठरवलं होते तो–! आणि ज्याला शोषणव्यवस्था चिरडते आहे–तो! मी त्याला माझ्या कलानिर्मितीचा नायक केला आहे. तुम्हीही

त्याला आपल्या विचाराचा आणि देशाच्या सर्व गतिविधीचाही नायक मानावे असे मला वाटते."

बागुल पुढे लिहितात– "व्यवस्था दुःख, दैन्य, दास्य आणि कुरूपता निर्माण करते. केवळ काहींच्या स्वार्थासाठी–हे लक्षात आले अन् लिहिले की, दलित साहित्य होते–दलित-साहित्य म्हणजे क्रान्तीत्व ! सम्यक !"

दलितसाहित्याची तात्त्विक बैठक आणखी दृढ आणि स्थिर केली– प्रा. गंगाधर पानतावणे, प्रा. रा. ग. जाधव आणि प्रा. ताराचंद खांडेकर या त्या साहित्याच्या भाष्यकारांनी.

प्रा. पानतावणे यांच्या मते, "दलित् साहित्य हे नव्या सांस्कृतिक परिवर्तनाचा जाहीरनामा होय." (बिल्वदल – दिवाळी १९७७)

नागपूरचे प्रा. ताराचंद खांडेकर यांनी परखड विचार मांडला आहे– "दलितांची अस्मिता जी कधी दलित साहित्याने विचारात घेतलीच नाही त्या अस्मितेचे केवळ चित्रणच नव्हे तर तिचे सांस्कृतिक अभिसरण आणि उदात्तीकरणही दलित साहित्याद्वारे व्हावयाचे आहे."

प्रा. खांडेकर पुढे लिहितात– "दलितांचे जीवन आणि त्यांचे सांस्कृतिक विश्व हे गावकुसाबाहेरचे असले तरी त्यातून त्यांनी जोपासलेली मानवी मनाची सजीव स्पंदने ही तथाकथित उच्चवर्णीय मानवी स्पंदनाइतकीच समृद्ध आहेत."

(सिंहगर्जना – दलितसाहित्य विशेषांक–१९७४.)

प्रा. खांडेकरांनी ज्या अस्मितेचा उल्लेख केला आहे, ती केवळ दलितांची नाही. ती आहे माणसाची ! दोन हात, दोन पाय, डोळे–कान–नाक असूनही जगण्यासाठी आक्रोश करणाऱ्या करुण माणसाची ही अस्मिता या दलितसाहित्याला सुरक्षित ठेवायची आहे, जागृत ठेवायची आहे.

डांगळ्यांच्या 'अंतहीन' कथेतला भीमनाथ या अस्मितेची जाणीव असल्यामुळेच पाटलालाही सांगू शकतो,

'समजलं का पाटील, आमी तुमचं सालकर जरी असलू तरी आमाला बी इज्जत हाय. इतका वेळ गरिबावानी सांगतुया तर झिडकारताय, हे बरं नव्हं.'

मात्र डांगळ्यांच्या इतर कथांतील अनेक माणसे विद्रोहाच्या आगीवर पाणी ओतणारीही आहेत. 'छावणी हालते आहे'ची बुलंद वल्गना करणारा आवाज चिरका, रडका, घायाळ स्वरूपात का दिसतो असं मात्र मी म्हणणार नाही. कारण गावकुसाबाहेरच्या दैन्याला, किंकाळ्यांना आपण पाठ फिरवून दुर्लक्षिणार नाही.

आपला जन्म नव्या पुलावरून खालच्या नदीतील पाण्यावरचे प्रेत पहाणाऱ्या किंवा होडीवाला पहाणाऱ्यांच्या गर्दीतला आहे. शोषणाची अमानुष मर्यादा स्वीकारलेल्या, घुसमटणाऱ्या महारवाड्याची पायरी आपण अजून चढलेलो नाही.

त्या पायरीवर चढून आपण आत बघू शकलात तरच तुम्हाला अंधार, काळोख म्हणजे काय, याची डोळ्यांपुढे काजवे चमकवणारी जाणीव येणार आहे. शब्दशः नाही तरी डांगळ्यांच्या या कथांच्या पायऱ्यांवरून तुम्ही तुमच्याच समाजातील दुबळ्या, दीन माणसांचे उरी फुटणारे जीवन पाहू शकता. ही जीवने भाकरीच्या एका तुकड्यासाठी कुत्र्याशी भांडत असतात, कमरेला गुंडाळावयाच्या कापडासाठी तान्हेल्या मुलाच्या दुपट्ट्याचाही आधार घेतात–यातले तुम्हाला काहीच माहीत नसेल. असली माणसे तुमच्या कॉलनीत, सोसायट्यांमधून जवळपास नक्कीच रहात नसतील; पण म्हणून ती माणसेच नाहीत असे म्हणण्याचा करंटेपणा करू नका. तुमच्या सहवासात राहिलेल्या एका कवीनं आपली फसवणूक कशी झाली हे सांगितलंय. तो म्हणतो–

'तुमच्या पूजनीय अशा सांस्कृतिक विकृतीची शपथ घेऊन सांगतो,

तत्वज्ञानाचे हवाले देऊन माणसांना खाणाऱ्या तुमच्या जगात, मला नितांत चुकल्यासारखे वाटते. जीव लागत नाही. नामंकटांनो तुमच्या जमावात भडभडून परक्यासारखे वाटते.

अजून तुमच्या जगण्याची सवय मला होत नाही. सांगेन म्हणतो, ह्या जन्माने केलेली माझी फसवणूक आणि तुमची भाषा मला येत नाही.'

(उत्थानगुंफा–प्रा. यशवंत मनोहर)

म्हणूनच माणसाच्या अस्मितेचा विचार जाणवतो दलित कथेत प्रगटतो. त्यावेळी तिच्या कक्षा अधिकच रुंद होतात. कारण मग ती कथा कांबळे, गायकवाड या आडनावाच्या दलिताचीच रहात नाही. तर गोडबोले, उपाध्ये या भिक्षुकीमुळे दरिद्र्यात पिचलेल्या पण व्यवस्थेनं उच्चवर्णीय मानलेल्या माणसाचीही कथा होते. ही व्यापकता विशालता दलित साहित्यात अधिक स्पष्टपणे दृग्गोचर झाली; तर आज या साहित्याशी होणारी अनाठायी टीकाही संपू शकेल.

योगिराज वाघमारे यांची 'ममम्हात्म्यम्' कथा वाचताना खेड्यात साध्या बदलीसाठी रजेसाठी तडफडणारा गळून जाणारा एक परिस्थिती शरण–शिक्षक आपल्यासमोर येतो. आज आपल्या खेडेगावांचा विचार केला तर असा परिस्थिति–शरण शिक्षक मराठाही असू शकतो आणि ब्राह्मणही असू शकेल अशी अवस्था आहे.

अर्जुन डांगळे यांच्या या कथा वास्तवाचं पुरतं भान ठेवणाऱ्या आहेत. या कथा वाचत असताना आपण वर्तमानकाळातच आहोत ही जाणीव वाचकाला सतत रहाते. याचं कारण या कथांनी वर्तमानातल्या दलित–अत्याचाराची धग आपल्या उरात धुमसत ठेवली आहे.

'अंतहीत' ही कथा गवई बंधूंचे डोळे काढल्याची भीषण घटना आपल्यासमोर उभी करते. शब्दजंजाळात न अडकता या कथेत वाचकांना अंतर्मुख करण्याची शक्ती आहे. 'भयानक किंचाळ्यांनी अंधार भरभरला.' या वाक्यातून आपण एका भीषण धक्क्याचा अनुभव घेतो.

काही कथा वाचताना आपण वृत्तपत्रातील वृत्तांत–कथन वाचीत आहोत असं वाटतं. याचं कारण या कथा आकारासाठी किंवा विशिष्ट आकृतिबंधाचा ध्यास घेऊन जन्माला आलेल्या नाहीत. त्या सत्यकथनासाठी प्रगट झाल्यात. तुम्हाला माहित नसलेल्या, तुम्ही न पाहिलेल्या जीवनाचा दरवाजाच फक्त त्यांनी तुम्हाला उघडून दिला आहे.

श्री. डांगळे दलित–चळवळीतले प्रमुख कार्यकर्ते असल्याने त्यांच्या काही कथा या चळवळीचा संदर्भ असलेल्या आहेत. 'यादवी' 'जय संतोषी माता' 'आणि बुद्ध मरून पडली या कथा म्हणजे चळवळीच्या नेत्यानं केलेलं आत्मपरीक्षण आसच म्हणावं लागेल. अशा विचारांशी साम्य राखण्याच्या काही

कथा वाघमारे यांच्या 'उद्रेक' मध्येही वाचायला मिळतात.

स्वतःपुरती, सीमित आत्मकेंद्रित वृत्ती सोडून समाजाच्या उत्थानाची चिंता वाहणारी ही चळवळ. मात्र नेते फार दूरवर, खोलवर गाळात जायला तयार नाहीत. त्यांना आपल्या मतभेदांमुळे चळवळीचा विचका होईल याचे भान दिसत नाही. 'यादवी' कथेचा शेवट या अर्थानं फार बोलका व सूचक आहे.

—'डॉक्टरांच्या बंगल्याजवळ आलो. कम्पाउण्डच्या बाजूला बरीच माणसे जमली होती. ती हर्षभरित असल्याचे दिसत होते. मी पण डोकावलो. दोन कोंबडे आपापसात झुंजत होते. त्यांच्या झुंजीने जमलेले आनंदीत होत होते. त्यातला एक कोंबडा रक्तबंबाळ होत होता. कशासाठी ? कुणासाठी ?'

प्रारंभीच म्हटल्याप्रमाणे डांगळे पुन्हा प्रश्नांच्या घेराओतच अडकले आहेत. हे प्रश्न चळवळीत शिरलेल्या अनेक अपप्रवृत्तींनी निर्माण केले आहेत, अहम्च्या वर्चस्वाच्या स्पर्धेतून जन्माला आले आहेत, प्रत्येकाच्या कातडीबचावू वृत्तीतूनही निर्माण झाले आहेत. या सगळ्या प्रवृत्तींशी असलेला आपला विरोधच डांगळे नोंदवितात.

'आणि बुद्ध मरून पडला' यातही डांगळे तेच पण अधिक प्रभावी शब्दात सांगतात. वर्णव्यवस्थेचा स्वीकार केलेल्या समाजानं ज्या वृत्ती-प्रवृत्ती, कर्मकांड—अवडंबर यांचा उदोउदो केला, त्याच प्रवृत्ती-कर्मकांडाला या चळवळीनं स्वीकारलं तर दलितांचा उद्धार, उत्थान हे स्वप्न ठरणार नाही का, या चिंतेत या कथेचा नायक अशोक व्यथित झालेला आहे. कथेचा शेवट अशोकच्या मनाची तगमग नेमकी व्यक्त करतो. 'त्याने समोर पाहिले, समोर मंडळी होती. त्याने खाली पाहिले, बाप मरून पडला होता. त्याने मान वरती केली, बराच वेळ तशीच ठेवली आणि पुन्हा खाली पाहिले. बापाच्या जागी त्याला बुद्ध मरून पडलेला दिसत होता.'

उच्चवर्णीयांच्या स्वभावाला साजेसं एक व्यक्तिमत्त्व वाघमारेसाहेबांच्या रुपानं त्यांनी 'प्रमोशन' या कथेत उभं केलं आहे. आपला पांढरपेशेपणा जपण्याचा प्रयत्न करणारा हा साहेब. शेवटी आपण बहिष्कृत आहोत या आपल्या मुलाबाबत घडलेल्या एका प्रसंगानं साहेब हादरून जातो ! ऑफिसातला त्याचा पोशाखी रुबाव डबक्यातल्या घाणीतून वाहू लागतो ! त्याच्या प्रमोशनचे पंखच गळून पडतात !

आपल्या शोषित समाजातलं उघडंनागडं, भीषण जीवन फूटपाथच्या कोपऱ्यावर धंदा करणाऱ्या आया-बहिणींच्या रुपानं दिसताच डांगळे त्वेषानं लिहितात—

'खरं म्हणजे या व्यवस्थेलाच घोड्याचे मूत पाजलं पाहिजे.'

'पांढऱ्या पायाची', 'जय संतोषी माता' या कथा आंधळ्या श्रद्धा, चुकीच्या समजुती, भोंदूगिरीतून आलेल्या अप-प्रवृत्ती यांच्याकडे कडव्या दृष्टीनं पाहतात. अनेक विचारवंतांनी, लेखक-कवींनी सामाजिक सुधारणेची जी कल्पना मांडली आहे, त्यासाठी अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, गंडेदोरे यांचा प्रभाव याविरुद्ध दलित लेखकांनी रान उभे केले पाहिजे. त्यांच्या समाजाच्या दृष्टीने नव्हे तर एकूणच या समाजव्यवस्थेची आज ती एक गरज आहे. दैववादात रुतलेला हा समाजरथ कोणीतरी बुद्धिवादाचे बळकट हात देऊन वर ओढला पाहिजे. या खुळ्या गोष्टीत व्यर्थ जाणारी श्रद्धा, पैसा, माणसे ही या उत्थान-रथाच्या सारथ्यात गुंतली तर दिशाहीनता संपेल.

आता या संग्रहातील 'ही बांधावरची माणसं' या शीर्षक कथेबद्दल. 'एक सत्यकथा' असं याचं कंसात उपशीर्षक आहे. नगर जिल्ह्यातल्या पोहेगाव या गावाजवळील सोनेवाडीच्या शिवारात कांता या कोवळ्या तरुणीवर करण्यात आलेल्या बलात्काराची वृत्तांत स्वरूपात सांगितलेली ही माणुसकीला कलंक लावणारी घटना.

पुस्तकाच्या मुखपृष्ठावर या कथेच्या अनुषंगाने असलेलं काळ्या-पांढऱ्या रंगातलं रेखाचित्र ( सुभाष अवचट यानी काढलेलं ) कथा वाचल्यानंतर किती अर्थपूर्ण आहे नि भेदक आहे याची साक्ष पटवणारं आहे.

ही वृत्तांत-कथा वाचीत असताना समाजातील अनेक प्रवृत्तींचं एवढं परिणामकारी दर्शन होतं की, त्यातल्या मोर्चामध्ये आपणही आपणही मनाने सामील होतो.

त्यातल्या दुर्दैवी कांताचे वडील दौलतराव 'असल्या अत्याचारांचे मूळ काय ?' या प्रश्नाचे जे उत्तर देतात ते सरळ इथल्या उन्मत्त, सरंजामी, जमीनदारी प्रवृत्तीना विरोध करणारं आहे. दौलतराव म्हणतात— 'गरिबीमुळे असले अत्याचार घडतात. गावातला ग्रामसेवक, तलाठी, पाटील आणि सोसायटीचा सेक्रेटरी ही चौकडी गावच्या राजकारणावर पंजा ठेवून असते. ह्यानी पोसलेले त्यांचे गुंड त्यांना साथ देतात. हे मूळ कोणीतरी तोडले पाहिजे.'

डांगळ्यांनी हे मूळ तोडण्याचं आव्हान चित्त्यासारखी अन्यायावर झेप घेणाऱ्या दलित-चळवळीच्या कार्यकर्त्यांना दिलेलं आहे.

'ही बांधावरची माणसे
गातात रोज भुकेची गाणी
सूर्य उगवतो त्यांच्यासाठी
घेऊन रोज अत्याचाराची कहाणी'

हे आजही अटळ आहे, तर तो सूर्यच कोणीतरी आपल्या वज्रदेही हातांनी अथांग सागराच्या तळाशी फेकून दिला पाहिजे !

लादलेल्या या चौकटीला, व्यवस्थेला उधळून लावायचा डाव कोणीतरी रचना पाहिजे. त्यासाठी यशवंत मनोहर म्हणतात तेच सामर्थ्य हवे—

'दिशांच्या या आंधळ्या वरात
पुन्हा एकदा दिवा लाव
कोटी सूर्य उरात घेवून
किंवा डावच उधळून लावा !'

आणि कोटी सूर्याची धग उरात घेवून डाव उधळला गेला तर डांगळे म्हणतात त्याप्रमाणे 'उजळ, शिल्पित' स्वप्न साकार होण्याचा हवाहवासा वाटणारा क्षण दृष्टिटप्प्यात येईल !

**—अरुण खोरे**

**ही बांधावरची माणसं**
अर्जुन डांगळे ( कथा संग्रह )
प्रकाशक—सुधीर वेडेकर, मागोवा प्रकाशन
१२५९/२, जं. म. रस्ता, पुणे ४.
पृष्ठे : १०२+२७. मूल्य : आठ रुपये

---

फिनिक्स ग्रंथालय

# The Unexplained

(Non Fiction)
By F. L. Boschke
(Pages 273, Pocket Books)
Translated from German
By Jon Van Heurck.

---

अलीकडे जवळजवळ सर्व इंग्रजी पुस्तकांच्या मज्जारज्जूवर (Spine) किंवा मागे त्या पुस्तकासंबंधी वर्गीकरण दिलेले असते.

उदाहरणार्थ Fiction, Non-Fiction, Current events, General Science, Occultism, Cosmology, Autobiography वगैरे. हे असे लिहिल्यामुळे पुस्तके निवडणे सुलभ होते. त्याशिवाय पुस्तकाबद्दल अल्पशी माहिती मागील बाजूस असतेच. मला वाटते की, मराठी पुस्तकावरसुद्धा हे असले लिहिणे सक्तीचे करावे. कधीकधी एखादे मराठी पुस्तक कोणत्या विषयावर आहे त्याचा सुगावा लागण्यासाठी बराच वेळ जातो. वाचनालयात वाचकांना काय व हौशी मंडळींना पुस्तकाच्या दुकानात खरेदी करतांना काय, ही प्रथा फार सोयीची जाईल. इंग्रजी पुस्तकांचे विश्व इतके मोठे आहे व ती इतकी भाराभर येतात की त्यामधून कोणती वाचनालयासाठी निवडावी ही एक समस्याच होऊन बसते. अपुरी जागा, तुटपुंजे बजेट, व्यवस्थापनाच्या व पुस्तकांच्या वाढीव किंमती व जास्तीत जास्त वाचकांचे कसे समाधान होईल याचा विचार करून ग्रंथालयासाठी पुस्तके विकत घ्यावी लागतात.

थोड्या महिन्यांपूर्वी Times of India च्या 'सिटी लाइट्स्' या सदरात इंग्रजी पुस्तकासंबंधी एक छोटी बातमी आली होती. त्यात असे लिहिले होते की, वाचक आता fiction पेक्षा Non-fiction जास्त पसंत करतात आणि गूढ व अगम्य विषयावरील पुस्तके जास्त खपतात. मी स्वत: माझ्या वाचनालयासाठी गूढ व अगम्य विषयावर शेकडो पुस्तके खरेदी केली. या विभागाकडच्या वाचकांचा प्रतिसाद फारच चांगला मिळाला. एकदा का असा वाचक वर्ग निर्माण झाला की त्या त्या विषयावर भराभर पुस्तके विकत घेणे सोपे जाते. जर एखादा UFO पृथ्वीवर उतरला तर माझ्या वाचनालयावर उड्या पडतील !

कार्ल स्वारझ्चाइल्ड हा एक मोठा जर्मन खगोलशास्त्रज्ञ होऊन गेला. तो सोळा वर्षांचा असताना या विषयावर लेख लिहीत असे. तो २८ वर्षांचा असतानाच एका मोठ्या वेधशाळेचा संचालक झाला होता.

स्वारझचाइल्डने असा एक सिद्धांत मांडला होता की, निश्चल उभ्या असलेल्या व्यक्तीला असीम गुरुत्वाकर्षणाचा अनुभव येतो. यावरून असा एक निष्कर्ष निघाला की, जेव्हा एखाद्या तान्याचे गुरुत्वाकर्षण (Gravitational Collapse) कोलमडते तेव्हा या तान्याचा प्रकाश पहाणान्यापर्यंत पोहोचतच नाही ! म्हणजे अवकाशात काय चालले आहे ते पहाणाऱ्याला दिसतच नाही ! यालाच खगोलशास्त्रज्ञ 'ब्लॅक होल्स' म्हणतात. ज्या ताऱ्यावरचे गुरुत्वाकर्षण कोलमडून पडते तिथे कुणी असेल त्यांना काय होईल ? त्याला जर भान राहिले किंवा तो जिवंत राहिला तर त्याला असे आढळून येईल की; तो ताऱ्याच्या मध्यभागावर प्रचंड वेगाने फेकला जात आहे. फेकला जाऊन तो एका वेगळयाच विश्वात जाईल. तिकडून तो कधीच परत येणार नाही. त्या विश्वाशी आपल्या विश्वाचे दळणवळण कधीच घडून येणार नाही. कोलमडणाऱ्या गुरुत्वाकर्षणापेक्षा अगदी विरुद्ध म्हणजे असीम प्रसरण (Ceaseless expansion) यालाच 'White holes' सुद्धा म्हणतात. 'ब्लॅक होल्स' विषयी बरेच काही वाचण्यात आले होते. पण 'White holes' असतात ते मी आत्ताच या पुस्तकात वाचले.

इतर आकाशगंगा असतात हे मानवाला गेल्या ५० वर्षांतच कळले आहे. अवकाशात किती तरी दशलक्ष आकाशगंगा आहेत. आपल्याला सर्वांत जवळची आकाशगंगा म्हणजे 'अन्ड्रॉमेडा नेब्युला !'

झाडाचे खोड प्रतिवर्षी एक रिंग तयार करते. ही रिंग किती रुंद आहे त्यावरून त्या वर्षीच्या हवामानाचा अंदाज बांधता येतो. सायबेरियामध्ये १९०८ साली एक प्रचंड अणुबाँबसारखा प्रचंड स्फोट झाला होता. हा स्फोट उल्कापातामुळे झाला की, परग्रहावरील जीवनांनी तो घडवून आणला यावद्दलचा वाद अजूनही संपला नाही. हे प्रकरण सायबेरियन किंवा 'तुंगुस्का उल्का' म्हणून प्रसिद्ध आहे. हा स्फोट झाला तेव्हा प्रखर अग्नीमुळे काही झाडांच्या खोडांमधील रिंगा अजूनही जळलेल्या अवस्थेत आहेत.

१९७८ मध्ये मुंबई, बडोदा, अहमदाबाद वगैरे ठिकाणी UFOS दिसले होते. दिल्लीतील महाभयानक २-४ मिनिटांचे चक्रीवादळ व आंध्र प्रदेशामधील राक्षसी लाटा या UFO मुळे झाल्या असतील असा सिद्धांत एका प्राध्यापकाने मांडला आहे !

१९३५ मध्ये फ्लॉरिडामध्ये २०० मैलाचे प्रचंड वादळ झाले होते. त्यामुळे वाळू इतक्या जोराने उडाली की, बऱ्याच मोटारींचे रंग खरडून गेले. काही लोकांची कातडी अक्षरश: सोलून निघाली. अशा वादळांना इंग्रजीमध्ये किती तरी नावे आहेत. हरीकेन्स, गेल्स, टॉर्नेडोज, मीस्ट्रल्स, बोराज, सायक्लोन्स, स्पिंग स्टॉर्मस् वगैरे. त्सुनामी म्हणजे मात्र जोराने पुढे येणारी लाट. दक्षिण अमेरिकेत (USA) अशी वादळे बऱ्याच प्रमाणात होत असतात. अमेरिकेत तर हरिकेन्सला बायकांची नावे देतात !

१९६१ मध्ये झालेल्या हरिकेन कार्लात ५० मिगेटन बाँब्स इतकी प्रचंड शक्ती होती. ( Hell Knoweth no fury like a woman stormed ! ) ही नांवे अशासाठी दिलेली असतात की तिकडे वादळे कधीकधी लागोपाठ होत असतात. पत्रकारांना वादळांचा उल्लेख करायला सोपे जावे म्हणून ! नवीन वर्षाच्या सुरुवातीला जे पहिले हरिकेन होईल त्याला A (Ada) वरून नाव द्यायचे. दुसऱ्याला B वरून Betty वगैरे. एकाच वर्षात २६ पेक्षा जास्त हरिकेन्स झाली नाही म्हणजे मिळवली !

टॉर्नेडोजमध्ये अफाट शक्ती असते. एकदा एक आगगाडीच वादळाच्या शक्तीने रुळावरून उडाली होती ! दुसऱ्या एका हरिकेनमध्ये काही माणसे अलगद उचलली गेली होती व परत हळूच खाली आली होती. कान्सासमधे तर गाईचा एक कळप हवेमध्ये पक्ष्यांसारखा उडाला होता ! त्सुनामी (प्रचंड लाट) हा जपानी शब्द आहे. या प्रचंड लाटांची उंची २०० फूटांपर्यंत असू शकते ! १७३७ मध्ये कामचाटकाला (सायबेरिया) मध्ये एवढ्या मोठ्या लाटेने तडाखा दिला होता. किनाऱ्यावर एखादी मोठी त्सुनामी आदळायची असेल तर समुद्राचे पाणी आधी ओहोटीची वेळ नसताना एकदम मागे जाते व परत त्सुनामीच्या रूपाने प्रचंड वेगाने (कधीकधी ताशी ५०० मैल वेगाने) परत येते.

याशिवाय या पुस्तकात अॅटलांटिस, UFOS ज्वालामुखी, हॉलोअर्थ थिअरी, धातुपरिवर्तनविद्या, फिलॉसॉफर्स स्टोन्स, उल्कापात, भूकंप वगैरे विषयांवर बरीच माहिती आहे. कधीकधी लेखकाचा दृष्टिकोन एकांगी व परस्परविरोधी वाटतो. क्वचित प्रसंगी मी प्रकाशकाचे नांव बघूनही पुस्तक विकत घेतो. कांगारूच्या शेपटीने P वर वळसा घेतलेल्या प्रकाशकाबद्दल माझे मत चांगले आहे आणि ब्रिटिश व अमेरिकन पुस्तकांत मुद्रादोष असणे हा एक क्वचितच होणारा प्रकार आहेच; परंतु पान नं. २५८ वर एक क्रियापद चुकून दोनदा छापले गेले आहे. मुद्राराक्षसाचा प्रवेश 'फॉरिन' पुस्तकातही होतोय काय ?

-जे. एन्. पोंडा

# रंगभूमी

विनया खडपेकर

# महासागर

## समाधान देणारे

श्री. जयवंत दळवी लिखित आणि विजया मेहता दिग्दर्शित 'महासागर' हे नाटक पाहिले आणि बऱ्याच दिवसांनी एक बरे नाटक पाहिल्याचे समाधान लाभले.

'कलावैभव'निर्मित या नाटकाचा दुसरा प्रयोग १५ ऑगस्ट या दिवशी साहित्यसंघ-मंदिर गिरगाव येथे सकाळी अकरा वाजता सादर झाला.

दिगप्पाच्या भोवतालच्या कौटुंबिक परिस्थितीचा दबाव, त्या पार्श्वभूमीवर घनश्यामच्या घराचे सुखी चित्र, यातून चाललेला दिगप्पाचा जीवनप्रवास, त्याने लावलेले जीवनाचे अर्थ हा या नाटकाचा मुख्य विषय आहे.

दिगंबर हा विमाएजंट. त्याची पत्नी चंपू. त्याच्या कुटुंबात त्याचा छाकटा वेडसर भाऊ वसंता आहे. विधवा गंगूकाकी आहे. त्याची आई आहे. वडील परागंदा. त्याला तीन मुली आहेत. दिगंबरची मैत्रीण सुमी. तिचा पती घनःश्याम. मुलगा बंटचा. ते एक सुखी, श्रीमंत, आटोपशीर कुटुंब आहे.

'बॅरिस्टर'प्रमाणेच जयवंत दळवींच्या याही नाटकाची प्रकृती मनोविश्लेषणात्मक आहे. येथे कथानकाला महत्त्व नाही. प्रेयसीने दुसऱ्याशी विवाह केल्यामुळे वसंताला वेड लागते. दिगंबर-चंपूच्या पहिल्या रात्री त्याला जबरदस्त झटका येतो. त्यांचे सुख नासते. लोणावळ्याचा 'हनीमून' रद्द होतो. त्या तशा संसारात चंपू हळूहळू पिचत जाते. दिगंबर व्यवहारी होतो. पिचत नाही. 'सुमी–घनःश्यामचे घर म्हणजे त्याचा विरंगुळा. सुमी रेहमानबरोबर वाहवत असल्याचे त्याच्या लक्षात येते. तो तिला धोक्याचा इशारा देतो; पण थांबवू शकत नाही. घनःश्यामला कळते तेव्हा त्याच्यावर जबरदस्त आघात होतो. सुमीला कोंडून ठेवतो. बंटचाची रवानगी पाचगणीला करायचे ठरवतो. पश्चात्तापदग्ध रेहमान आणि सुमी आत्महत्या करतात, असे हे थोडक्यात कथानक.

उत्कृष्ट व्यक्तिचित्रणे हे या नाटकाचे वैशिष्ट्य. दिगंबरची आई निरुपद्रवी, नगण्य, गरीब स्त्री; परंतु नाटकात हिची आवश्यकताच नाही असे वाटत नाही. कुटुंबातील वातावरणनिर्मितीचा ती एक महत्त्वाचा घटक आहे. तिच्या साध्या चालण्यातून, बोलण्यातून तिचे अगतिक व्यक्तिमत्त्व दिसते. गंगूकाकी फटकळ, जुन्या वळणाची, प्रेमळ पण उपद्रवी स्त्री. ती घरातल्या सगळ्यांवर गरजते आणि बरसतेही. वसंता वेड लागलेला तरीही समंजस वहिनीचा पदर धरणारा वसंता म्हणूनच आपली चूक भावाकडे कबूल करतो. झटका येतोसे वाटले की स्वतःच आपल्या खोलीत जाऊन काकीला कुलूप लावायला सांगतो. चंपू संसाराच्या खस्ता खाणारी, नवऱ्यावर प्रेम करणारी साधीसुधी स्त्री. मात्र तिला समंजसपणाचा पुतळा बनवून निर्जीव केले नाही. (असे बऱ्याच ठिकाणी आढळते) ती संसाराचे कष्ट कष्ट उपसत असते तरी गंगूकाकीशी भांडते. वसंताला इस्पितळात पाठवा म्हणते. सुमीवरून नवऱ्याचा संशय घेते. सुमी श्रीमंत, सुखी, सदा खळाखळा हसणारी, फटाफटा बोलणारी, चावट बोलणारी. नवऱ्यावर भरपूर प्रेम करणारी. येता-जाता त्याच्या गळ्यात पडत, त्याला मिठ्या मारीत ते व्यक्त करणारी. तिचे दिगप्पाला 'तू मला मागणी का घातली नाहीस?' असे विचारणे किंवा मद्य नको म्हणणाऱ्या चंपूला 'अग घे ग! म्हणून तुला मुलगा झाला नाही' असे बोलणे सगळेच गंमतीचे अशी ही सुमी रेहमानची आहारी जाते. घनःश्यामच्या विश्वासू प्रेमळ बोलण्याने व्यथित होते. घनःश्याम जेव्हा मुलाच्या जन्माबद्दल संशय व्यक्त करतो तेव्हा दुःखावेगाने हंबरडा फोडतो तरीही तिच्या व्यक्तिमत्त्वाला कोठे तडा जात नाही. इतक्या उथळ स्वभावाच्या स्त्रीचे ते करुणरुदन म्हणजे अचानक सनसनाटी दिलेली कलाटणी वाटत नाही. घनःश्याम एक श्रीमंत, कर्तृत्ववान, उमदा पुरुष. तो पत्नीवर प्रेम करतो. तिच्या 'सोशलवर्क'चे कौतुक करतो. रेहमानबरोबर खी खी करणाऱ्या सुमीला बोलावून न रागावता म्हणतो, 'हे थोडं जास्त होणार आहे' त्या वेळीही सुमीबद्दल त्याचे मन स्वच्छ आहे. 'हे बरे दिसत नाही' एवढाच बोलण्याचा अभिप्राय आहे हे कळते. तरीही सुमीने केलेला विश्वासघात पाहताच त्याचे भडकणे, अतिरेकी वागणे, बोलणे हे कोठे विसंगत वाटत नाही. दिगंबर साधासुधा मध्यमवर्गीय, कुटुंबाला जखडलेला; पण त्यात बुडालेला नाही. तो कर्तव्यतत्पर आहे. त्याच्या मनाचा तोल जात नाही. भोवतालचे जग निरखीत तो स्वतः विचार करीत राहतो. ही उत्कृष्ट व्यक्तिचित्रणे हे लेखक, दिग्दर्शक, कलाकार यांचे सामायिक यश आहे.

नाटकात दोष आहेतच. दोन कुटुंबचित्र वेगवेगळी म्हणून उत्तम आहेत. परंतु त्यात

अपेक्षित कलात्मक मेळ नाही. दिगंबरच्या कुटुंबाशी सुरुवात करून घन:शामच्या कुटुंबाशी नाटक संपते. सुरुवातीला दिगंबरचे कुटुंब प्रभावी आहे तर शेवटी अचानक घन:श्याम–सुमी यांच्या प्रश्नाला महत्त्व आले आहे. यामुळे इतर अनेक नाटकांप्रमाणे याही नाटकाचा तोल बिघडतो. एक जाणवते निरनिराळ्या व्यक्तींचे मन, माणसांच्या मनाचा 'महासागर' या नाटकातून लेखकाला दाखवायचा आहे. म्हणूनच भिन्न भिन्न मनोवृत्तीची माणसे यात आहेत. काकी घराला चिकटून का राहिली? 'चंपू नथोत का रडली?' असा मनाचा वेध घेता येतो; पण मनाच्या महासागराचे चित्र नाटकात प्रभावीपणे येत नाही. जर ते तसे असते तर विषयाचा तोल बिघडला नसता. शरच्चंद्र चटर्जी, रवींद्रनाथ यांच्या वाङ्मयातून जीवनाचा महासागर दिसतो, तसा तो या नाटकात दिसू शकत नाही. नाटक हे माध्यमही जीवनाचा किंवा मानवी मनाचा महासागर दाखविण्यास कमकुवत वाटते. नाटकाचे नाव त्यामुळे उचित वाटत नाही, असे वाटते. हे दाखवतात तळे आणि म्हणतात महासागर– सुराणा या पात्राची आवश्यकता वाटत नाही.

नाटकाचा शेवट भडक वाटतो. एकंदर कथेच्या प्रवाहात या दोन आत्महत्या अपरिहार्यपणे होतात असे वाटत नाही. प्रेक्षकांची सहानुभूती खेचण्यासाठी मुद्दाम केलेला हा भडक शेवट वाटतो. दिगंबर आणि क्वचित घन:श्याम मधूनच प्रेक्षकांशी संवाद करतात. ते नाटकाच्या प्रकृतीला बिलकूल मानवत नाही.

जयवंत दळवी यांच्या 'अथांग' या कादंबरीवर हे नाटक रचलेले आहे. कादंबरीशी तुलना करता नाटक काही बाबतीत श्रेष्ठ ठरते. काही बाबतीत उणे ठरते. कादंबरीमधे लैंगिकतेचे तपशील अगदी अपरिहार्यपणे येत नाहीत. बऱ्याच ठिकाणी ते चिवडले गेले आहेत. नाटकात हे चिवडणे बिलकूल नाही. कादंबरीपेक्षा नाटकातील व्यक्तिचित्रे अगदी जिवंत, वास्तव वाटतात. नाटक हे दृक् माध्यम असण्याचाही हा फायदा असू शकेल. कादंबरीत शेवटी सुमीवर पहाऱ्याला कोणी तरी गुंड आणून बसविला आहे. शिवाय दिगंबर आहेच. हे गुंडाचे अस्तित्व घन:श्यामच्या सुसंस्कृततेशी फारच विसंगत वाटते. ही कल्पनाही त्याला स्पर्श करील असे वाटत नाही. नाटकात हे पात्र टाळले आहे ते बरेच झाले. कादंबरीतील शेवटच्या प्रसंगात दिगंबर सुमीच्या पोटाचे चुंबन घेतो आणि त्या वेळी ती मरण पावलेली असते (हे त्याला माहीत नसते.) असे दाखविले आहे. हा प्रसंगही सवंग आणि भडक वाटतो. तोही नाटकात गाळला ते बरेच केले. मात्र कादंबरीत विषयाचा तोल ढळलेला नाही. दिगंबरचे पत्नीवरचे, भावावरचे प्रेम कादंबरीत अधिक स्पष्टपणे जाणवते. स्वतःच्या कुटुंबातून त्याच्यावर येणारे ताण कादंबरीत अगदी स्पष्टपणे, सहजपणे जाणवतात. त्यामुळे त्याचे सुमीच्या घरात विरंगुळा पाहणे अधिक पटते. दोन कुटुंबचित्रांत कलात्मक एकसंधत्व कादंबरीत आहे. तरीही कादंबरीत 'अथांग' मानवी जीवनाची प्रचीती येत नाहीच.

नाटकाचा प्रयोग चोख होतो. बहुतेक सर्व कलाकारांना आपापल्या भूमिकेचे उचित भान आहे. विशेष लक्षात राहतात, विक्रम गोखले (घन:शाम) आणि भारती आचरेकर (सुमी). आपल्या बोलण्यातून, चालण्यातून, हसण्यातून श्रीमंत, सुसंस्कृत, उत्कट मनोवृत्तीचा घन:शाम श्री. विक्रम गोखले यांनी सहजपणे साकार केला आहे. रेहमानशी सलगीने बोलणाऱ्या पत्नीला जवळ बोलावून थोडे समजावणे एवढा एक लहानसा प्रसंग घेतला तरी विक्रम गोखले यांनी त्यात किती सूक्ष्मता दाखविली आहे! घन:शामच्या त्यांनी दाखविलेल्या त्या चेहऱ्यावर पत्नीवरचा विश्वास आहे, तरी पुरुषी अहंकार दुखावला गेल्याची छटा आहे. शब्दांच्या स्वरात सुसंस्कृताचे समंजसपण आहे. उभे राहण्याच्या, स्पर्श करण्याच्या पद्धतीत उच्चभ्रू 'सोसायटी–मॅनर्स' आहेत. 'जास्वंदी', 'बॅरिस्टर' या त्यांच्या यशस्वी भूमिकांमध्ये आणखी एका सुंदर भूमिकेची भर पडली. भारती आचरेकर यांचेही असेच कौतुक वाटते. सुरुवातीला उथळ, चावट बोलणारी हसरी सुमी आणि शेवटची टाहो फोडणारी सुमी उभी करणे कठीण आहे; पण अतिशय सहजपणे त्यांनी हे आव्हान पेलले आहे. बाकी उषा नाडकर्णी (गंगूकाकी), मंगेश कुलकर्णी (वसंता), सुहासिनी आडारकर (आई), मीना जोशी (चंपू), मच्छिंद्र कांबळी (सुराणा), राजन वैद्य (नरहरी), मोहन भंडारी (रेहमान) यांनी आपापल्या भूमिका चोख पार पाडल्या आहेत. एकच भूमिका अपेक्षेप्रमाणे उभी राहू शकली नाही. ती म्हणजे नाना पाटेकर यांनी उभा केलेला दिगंबर. 'आम्ही लटिके ना बोलू', 'पाहिजे जातीचे', 'हमिदाबाईची कोठी' अशा निरनिराळ्या नाटकांत आपल्या अभिनयसामर्थ्याचे निरनिराळे आविष्कार दाखविणाऱ्या पाटेकरांनी येथे अगदीच निराशा केली आहे. ही भूमिका वेगळी, मध्यमवर्गीयाची म्हणून की काय न कळे, त्यांचा अभिनय अगदी ठोकळेबाज वाटतो. पुष्कळदा ते 'पाहिजे जातीचे'-मधील बबन्याप्रमाणे हसतात, बोलतात. ते या दिगंबरच्या व्यक्तिरेखेला अगदीच विसंगत वाटते. सत्तारच्या एकरंगी भूमिकेत ज्यांना प्राण ओतता आला, बबन्याचे ग्रामीण व्यक्तिमत्त्व ज्यांना सहजपणे पेलता आले त्या नाना पाटेकरांना दिगंबरच्या भूमिकेचा सूरच गवसला नाही हे पाहून आश्चर्य वाटते.

सखाराम भावे यांचे नेपथ्य आणि प्रकाश राजा देसाई यांचे पार्श्वसंगीत यातून दोन्ही कुटुंबांतील वातावरणाचा योग्य परिणाम साधला आहे. रामकृष्ण केळकर यांची रंगभूषा भूमिकानुकूल आहे.

काही दोष असले तरी प्रेक्षकांना गुंतवून ठेवणारे, समाधान देणारे हे नाटक आहे. □


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# अमरदीप

तुम्ही ' प्रेमनगर ' नावाचा सिनेमा पाहिला असेल. कल्पना करा की, त्याचा दाखवलेला शेवट थोडासा बदलून तो चालू ठेवलाय— हेमामालिनीचे लग्न होऊन ती सासरी जाते. मग तिच्या नवऱ्याला तिचे राजेश खन्नाबरोबरचे प्रकरण कळते. मग तो संशय घेऊ लागतो. मग राजेश खन्ना आत्मबलिदान करून, त्याचा संशय घालवतो–तर हा भाग घेऊन तो नासवला किंवा तुम्ही जुना ' अमरदीप ' पाहिला असला तर त्यात पद्मिनी, वैजयंतीमाला आणि देवआनंद यांच्या जागी अनुक्रमे राजेश खन्ना, विनोद मेहरा आणि शबाना आझमी टाकून त्या शिळ्या कढीला ऊत आणला की, 'अमरदीप' चित्रपट होतो.

एक राजा (राजेश खन्ना) नावाचा रईस तरुण. जगात जेवढी म्हणून व्यसने असतील, तेवढी सगळी त्याला लागलेली आहेत; शिवाय तो स्मगलिंग वगैरेही करतो. त्याला एक वहीण लता. दोघांचे प्रेम म्हणजे केवळ ' ओवाळिते मी लाडक्या भाऊराया ' या जातीचें. राजाची नजर जाते लताच्या मैत्रिणीवर – राधावर–(शबाना आझमी); पण सज्जन, सुशील राधा राजाचे स्थळ नाकारते. पुढे राजाकडे किशन (विनोद मेहरा) नावाचा तरुण नोकरीला लागतो. राजाकडे जे जे दुर्गुण आहेत त्याच्या बरोबर विरुद्ध सगळे सद्गुण किशनमध्ये ठासून भरलेले. एकदा अचानक राजला पत्ता लागतो की, अरे, किशन तर आपला धाकटा भाऊच! मग काय, राजा किशनवर प्रेम, वात्सल्य, माया इत्यादी ठेवणीतील भावनांचा वर्षाव सुरू करतो; पण आपण भाऊ असल्याचे मात्र त्याला कळू देत नाही. पुढे काही समज–गैरसमजांमुळे किशन संशयपिशाच्याने पछाडला जातो. अखेर त्याचा उध्वस्त होऊ घातलेला संसार वाचवण्यासाठी राजा आत्मबलिदान करतो. दरम्यानच्या काळात राजा व किशनने आपल्या दुर्गुण व सद्गुणांची अदलाबदल केल्यामुळे राजा थोर, महान, पुण्यश्लोक, थोडक्यात अमरदीप ठरतो !

या सगळ्या कौटुंबिक, रहस्यमय, विनोदी, अश्रुपूर्ण, सुखांत शोकांतिकेत अर्थातच सर्व मसाला ठासून आणि ठेचून भरलेला. सुरुवातीला राजाच्या भोवती गोंडा घोळणाऱ्या पोरी आणि राजाची बहीण लता ही खास मद्रासी गुणविशेष दाखवणारी मद्रासी पात्रे घेतल्यामुळे त्या मसाल्याला खास मद्रदेशीय चव आलेली. बिंदूचा दोन कॅबरे (एक प्रत्यक्ष, एक अप्रत्यक्ष), दोन शय्यादृश्ये, हनगल, शबाना आझमीचे बरीचशी अश्रुपाती दृश्ये, राजेश खन्नाची अधूनमधून प्रेक्षकांकडून हमखास टाळी घेणारी संवादफेक इत्यादी सर्व गोष्टींचा यथाशक्ती, यथामती उपयोग करून घेऊन चित्रपटाच्या आधी उल्लेखलेल्या कौटुंबिक, रहस्यपूर्ण इत्यादी इत्यादी बहुविध पैलूंना झळाळी आणली आहे.

संगीतकार लक्ष्मीकांत–प्यारेलाल आणि गीतकार आनंद बक्षी यांची कामगिरी काय वर्णावी ? एकमेव उल्लेखनीय भाग म्हणजे ' दुनिया है बेवफा ' या गीताला अनुराधाचा लागलेला फिट्ट आशाच्या जातीचा आवाज !

राजेश खन्नाबद्दल थोडेसे—

बऱ्याच फ्लॉप चित्रपट व भूमिकांनंतर ' प्रेमनगर'च्याच जातीची राजाची भूमिका त्याने खूपच बरी केली आहे. विशेषतः बाकी चित्रपटाच्या अन्य गदळ पार्श्वभूमीवर त्याचा राजा खूपच भाव खाऊन जातो.

एकंदरीत पार ' जेमिनी ' पासूनची चालत आलेली मद्रासी फॉर्म्युलाची परंपरा टिकवणारा हा विझू घातलेला 'अमरदीप!'

## पुणे वार्ता....

पृष्ठ ५ वरून

एक स्वतंत्र, एकसंध राजकीय अस्तित्व टिकवून धरतात, हीच फार मोठी achievement आहे. मी असं नेहमीच म्हणतो की, आपल्या देशाला शास्त्रज्ञाची आणि बुद्धिवंतांचो वाण नाही. या देशाच्या सध्याच्या अधोगतीला इथले धंदेवाईक राजकारणीच जबाबदार आहेत. एडमंड बर्कने असं म्हटलंय की, For evil to succeed, all that is necessary is good men do nothing ! आणि आज आपल्या देशात नेमकं हेच घडत आहे. खरं स्वातंत्र्य हे भुकेसारखं असतं. काल ते मिळालेलं असतं. आज टिकवण्याची गरज असते आणि उद्याही त्याच्यासाठी संघर्ष करावा लागतो.

' कधीही न संपणारं दारिद्र्य आणि तरीही कमालीची सहनशीलता हे आपल्या देशाला मिळालेले दोन शाप आहेत, असं अनेकजण म्हणतात. परंतु देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने हे दोन अतिशय फायदेशीर घटक आहेत, असं मला वाटतं. वैभवसंपन्न संस्कृती धुळीला मिळाल्या हा इतिहास आहे आणि जर्मनी, जपानसारख देश राखतूनच वर आले हाही एक इतिहास आहे. दारिद्र्यामुळे कोणताही देश नेस्तनाबूत होऊ शकत नाही; उलट उच्च नैतिक अधिष्ठान असलेले नेते जर अशा देशाला मिळाले तर तो जबरदस्त प्रगती करू शकतो. त्या दृष्टीने भारताचे भवितव्य उज्ज्वल आहे. कारण देशाला प्रगतीकडे नेण्यासाठी गारवीसारखा दुसरा force नाही. म्हणूनच मी असं म्हणेन की, आमचे आजचे राजकीय नेते हे खऱ्या भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी नाहीतच. हे चित्र जर आपण बदलू शकलो तर This nation has tremendous chance for survival. आणि त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणं हे आपल्या सर्वांचंच कर्तव्य आहे.

' शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ या आजच्या जगातील तिसरी सर्वांत मोठी शक्ती आहेत. भारतीयही त्यामध्ये माग नाहीत. इंग्लड-अमेरिकेत तर आज असं चित्र दिसतं की, तिथल्या इंग्लिश किंवा अमेरिकन डॉक्टरांपेक्षा भारतीय डॉक्टरच अधिक लोकप्रिय झाले आहेत. याचा परिणाम असा झाला

आहे की, स्थानिक डॉक्टरांनी या भारतीय डॉक्टरांच्या स्थलांतरावर निर्बंध आणायला लावले आहेत. कारण गंभीर आजारी असलेल्या रोग्याकडेही पाठ फिरवून वीक-एंडची मौज लुटायला जाणाऱ्या या डॉक्टरांच्या पार्श्वभूमीवर काळ-वेळाचं भान न ठेवता रोग्याची शुश्रूषा करणारे सेवाभावी भारतीय डॉक्टर जास्त लोकप्रिय होऊ लागले.

'भारतीयांच्या या काही अंगभूत गुणांबरोबरच देशांच्या प्रगतीच्या दृष्टीने त्यांना इतरही काही गोष्टी शिकवण्याची आवश्यकता आहे. चांगलं शिक्षण ही त्यापैकी प्रमुख आहे. त्याचा उपयोग या देशातील लोकशाही अधिक समृद्ध आणि परिपक्व करण्यासाठी होऊ शकेल. इथली जनता सुशिक्षित झाली की आपलं मौल्यवान मत कोणाला द्यायचं आणि का द्यायचं हे तिचं तिलाच कळू लागेल. संघटन ही आपल्या देशाची दुसरी तातडीची गरज आहे. संघटन म्हणज काय, हे भारतीयांना जणू माहीतच नाही. जीवनात काही शिस्त असावी असं आपल्याला वाटतच नाही. अर्थात आपल्या ते रक्तातच नाही, असं मात्र मी म्हणणार नाही. कारण आपलं लष्कर शिस्तबद्धतेचा उत्कृष्ट नमुना आहे. जगातील इतर कुठल्याही देशाचं लष्कर त्याबाबतीत आपल्यापेक्षा श्रेष्ठ नाही. पण आपण भारतीय लोक तसा काही त्रासच घेत नाही. शिस्तबद्धता आणि निःस्वार्थी सेवा हेच जपान-जर्मनीच्या यशाचं रहस्य आहे, हे आपण या संदर्भात विसरता कामा नय.

'भारतातील बेकारीचा प्रश्न जर खऱ्या अर्थाने आणि कायमचा सोडवायचा असेल तर अधिक ठोस पावलं उचलण्याची आज गरज आहे. त्या दृष्टीने उत्पादक श्रम आणि लोकसंख्या या दोन मुद्यांवर आपण भर दिला पाहिजे.

'या देशाच्या राजकीय जीवनपद्धतीतही आज मोठा बदल घडवून आणण्याची आवश्यकता आहे. धंदेवाइक राजकारण्यांनी हे क्षेत्र नासवून टाकलं आहे. त्यात सुधारणा करण्यासाठी पार्लमेंटमधील एकूण सभासदांपकी किमान दोनतृतियांश सभासद तरी सुशिक्षित, सुसंस्कृत असण्याची गरज आहे. तसंच रोजचा भाकरीच राजकारणावर अवलंबून नसलेल्यांनी राजकारणात अधिकाधिक कृतिशील सहभाग घेण्याची आज आवश्यकता आहे.

'आपली राज्यघटना राष्ट्रीय परंपरेचा उत्कृष्ट नमुना आहे. सध्याची देशातील राजकीय परिस्थिती पाहता फ्रान्ससारखी अध्यक्षीय लोकशाही पद्धतीच आपल्याकडेही उपयुक्त ठरु शकेल, मला वाटतं. त्यानुसार मंत्रिमडळातील सदस्य निवडणूकीत निवडून आलेल्या सभासदांमधून घेतले जाऊ नयेत तर पार्लमेंटबाहेरचे, पण त्या त्या क्षेत्रातले तज्ज्ञ असावेत. याचे तीन फायदे होतील.

१) देशातील उच्चतम टॅलेन्ट देशहितासाठी उपयोगात आणता येईल.

२) या सदस्यांना निवडून येण्याचे बंधन नसल्यामुळे लोकप्रियतेच्या स्पर्धेत त्यांना भाग घ्यावा लागणार नाही आणि त्यामुळे कोणत्यही Cheap किंवा populist धोरणांना हे सदस्य बळी पडणार नाहीत. देशाची राजकीय व आर्थिक धोरणे ठरवताना आणि त्यांची अमलबजावणी करताना केवळ देशहिताचाच विचार हे सदस्य करतील.

३) त्यांचा वेळ आणि श्रम राजकारणामध्ये अजिबात वाया जाणार नाही व त्यामुळे शासकीय कामांवर ते आपलं सारं लक्ष केंद्रित करु शकतील.

शेवटी मला आपणा सर्वांना एकच विनंती करावयाची आहे. आपण सर्वांनी सध्या देशात घडत असलेल्या राजकारणापासून धडा शिकावा आणि या धंदेवाईक राजकारण्यांच्या दयेच्या भीकेवर आम्ही इथून पुढे कधीही अवलंबून राहणार नाही, असा निर्धार या निमित्ताने आपण व्यक्त करावा. धन्यवाद!'

श्री. नानी पालखीवाला सुमारे 'सव्वा तास' अतिशय उत्कृष्ट इंग्लिशमध्ये बोलत होते. सबंध श्रोतृवृंद त्यांच्या भाषेमुळे आणि विचारांमुळेही अतिशय प्रभावित झाला होता. युद्धाच्या कथा जशा सैनिकाकडूनच ऐकायच्या असतात त्याप्रमाणे आणीबाणीसारख्या धोक्याच्या काळातही मानवी हक्क आणि स्वातंत्र्यासाठी जनतेचं प्रतिनिधित्व करणाऱ्या पालखीवालांचे विचार ऐकण्यात निराळाच आनंद होता. म्हणूनच त्यांचं भाषण संपल्यानंतर एक क्षणभर टाळीसुद्धा पडली नाही आणि नंतर सुरू झालेला कडकडाट श्री. पालखीवाला यांनी दोनदा लवून स्वीकार केल्यानंतरही किती तरी वेळ चालूच राहिला. पालखीवालांच्या कृतिशील बुद्धिमत्तेला पुणेकरांनी केलेलं ते नम्र अभिवादन होत.

□

# धिक्कार दिन, मुंबई

शनिवार, ता. २५ ऑगस्ट! जनता पक्षातर्फे 'धिक्कार दिन' पाळण्यात येणार होता. दिल्लीमध्ये 'बंद'चं आवाहन करण्यात आलं होतं, तर मुंबईमध्यं 'धिक्कार दिन' पाळण्यात येणार होता. या दिवसाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या 'धिक्कार दिना'निमित्त मुंबईच्या शिवाजी पार्कवर एक सभा होणार होती. आपल्या राजदूताच्या पदाचा करारीपणाने त्याग करणारे ज्येष्ठ समाजवादी नेते श्री. नानासाहेब गोरे, अटलबिहारी बाजपेयी आणि मोरारजी देसाई यांच्यासारखे अखिल भारतीय प्रतिमा असणारे नेते या सभेत भाषण करणार होते. साहजिकच माझीही पावलं तिकडे वळली. तत्पूर्वी दुपारी तीन वाजता मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे जॉर्ज फर्नांडिसशी वार्तालाप असल्याचंही कळलं. त्यामुळे संध्याकाळच्या शिवाजी पार्कवरील सभेआधी दुपारी पत्रकार संघात कार्यालय गाठलं.

वार्तालाप सुरू झाला. जॉर्ज उत्तर देत होता. काही वेळा हसून, काही वेळा गंभीरपणे, काही वेळा समजावणीच्या सुरात, तर काही वेळा संतापाचा आव आणून! कार्यालयाच्या दारातच 'प्रेस हॅन्ड आऊट' वाटलं जात होतं. त्याच्याच अनुरोधाने प्रश्नोत्तरांना सुरुवात झाली. राष्ट्रपतींनी लोकसभा बरखास्त करण्याचा घेतलेला निर्णय योग्यच आहे, आम्ही आताच जर पक्षातून बाहेर पडलो नसतो तर परिस्थिती अधिकच बिघडली असती, आगामी निवडणुकीत गरीब, पिळले जाणारे विरुद्ध श्रीमंत, पिळवणूक करणारे असा लढा होणार आहे, आणखी काही आठवडे थांबा म्हणजे खरे राजकीय चित्र स्पष्ट होईल, इंदिरा काँग्रेस

आणि रा. स्व. संघ यांचीच युती होण्याची दाट शक्यता आहे, राष्ट्रपतींवरील अभियोग ही निव्वळ थट्टा आहे वगैरे वगैरे साचेबंद, शिळे मुद्दे जॉर्ज नव्या आवेशाने मांडण्याचा प्रयत्न करत होता. आवाज चढवून, तावातावाने बोलत होता. जणू काही त्याचा भोंदूपणा पत्रकारांना कळतच नव्हता !

काही वेळ त्याची ही वाष्कळ बडबड ऐकून घेतल्यानंतर मुंबईच्या पत्रकारांनी आपली नखं बाहेर काढली आणि जॉर्जला अक्षरशः धारेवर धरलं. तुम्ही 'जनता'-पासून वेगळे बसता आणि तरीही पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला नाही हेही दुहेरी सदस्यत्वच नाही का ? इंदिरा गांधींना तुम्ही लोकांनीच आज महत्त्व आणून दिलेलं नाही का ? इंदिरा गांधींबद्दलचे तुमचे आजपर्यंतचे सर्व अंदाज सपशेल चुकले असताना Leave the idea of Mrs. Gandhi Coming back हे तुम्ही इतक्या आत्मविश्वासाने कसं सांगू शकता, आज तुम्ही ज्या खुर्चीत बसला आहात तिथेच पंधरा दिवसांपूर्वी गांधी बसल्या होत्या आणि वीस-पंचवीस मिनिटांत तिने सबंध प्रेस प्रभावीत करून टाकला होता. आजची तुमची उत्तरं मात्र अगदीच असमाधानकारक आणि मिळमिळीत आहेत, संघ-जनसंघ 'जनता'पासून दूर जात नाहीयाय, तर तुम्हीच त्यांना हाकून लावताय अशा शेऱ्यांनी जॉर्ज अगदी हबकून गेला. मग काही वेळा क्षुद्र शाब्दिक कोटी करायची, काही वेळा प्रक्षुब्ध होऊन प्रत्युत्तर दिल्यासारखं दाखवायचं, काही वेळा, तुम्ही म्हणता त्यात थोडं तथ्य आहे, असं म्हणून यशस्वी माघार घ्यायची, तर काही वेळा नुसतंच खोटं खोटं, ओशाळवाणं हसायचं असं जॉर्जचं चालू झालं. यातले कोणते पत्रकार आपल्यावर जास्त हल्ला करत आहेत हे लक्षात आल्यावर तर बी. एड्. चा पाठ घ्यायला आलेला शिक्षक जसा आपल्याला हवी असलेली उत्तरं देणाऱ्या मुलांनाच प्रश्न विचारतो तसं जॉर्ज करू लागला. प्रश्न कोणी विचारायचे हे तोच ठरवू लागला. रणदिव्यांनी त्याची दोन-तीनदा खिल्ली उडवल्यावर जॉर्ज त्यांच्याकडे दुर्लक्षच करायला लागला. मग दि. वि. गोखलेच इतरांकडे डोळे मिचकावून 'मि. रणदिवे वॉन्टस् टू आस्क समथिंग', असं म्हणून त्यांना उभं करायला लागले. एव्हाना जवळजवळ तास होत आला होता. ' जॉर्जपेक्षा पत्रकारच कंटाळायला लागले होते. एकेक जण काही तरी निमित्त काढून उठायला लागला. जॉर्जने परिस्थिती ओळखली आणि 'चला, बराच वेळ झाला...' असं काही तरी पुटपुटत तो उभा राहिला. सात-आठ लोकांपलीकडे त्याच्याभोवती कोणी राहिलंच नाही. काही तरी फुटकळ हास्य-विनोद करत जॉर्ज बाहेर पडला. कोणालाच त्याच्यात फारसा इंटरेस्ट राहिला नव्हता. फुटिरांबद्दल प्रेसमध्येही तिटकारा निर्माण झाल्याचं ते दृश्य निश्चितच सुखदायक होतं. ¤

याच ठिकाणी आणखी एक ऐकलेला किस्सा सांगून टाकतो. परवा म्हणे मृणाल गोरेंनी कशासाठी तरी मोर्चा काढायचं ठरवलं. मोर्चाची वेळ होऊन बराच अवधी लोटला तरी अपेक्षित जमाव काही जमेना. शेवटी आता वाट पाहण्यात अर्थ नाही, असं लक्षात आल्यावर एकूण किती लोक जमले आहेत याचा 'पाणीवाल्या बाई'ने अंदाज घेतला. त्यांची संख्या होती सतरा ! मग ताबडतोब या 'मोर्चा'चं म्हणे 'शिष्टमंडळा'त रूपांतर करण्यात आलं.

¤

पत्रकार संघातून बाहेर पडलो तेव्हा सव्वाचार वाजून गेले होते. शिवाजी पार्कवरची आजची 'धिक्कार दिना'ची सभा गाजणार, असा अंदाज सर्वचजण बोलून दाखवत होते. ईदचा दिवस होता. मुस्लिम स्त्री–पुरुष मोठ्या संख्येने खास मुस्लिम पेहराव करून बाहेर पडलेले दिसत होते. या लोकांच्या पेहरावाला जो रूबाब असतो, खानदानीपणा असतो तो काही औरच ! त्यांची ती उर्दूही मधाच्या बुधल्यात बुडवून काढलेली. साधी साधी वाक्यंही गालिबच्या गझलेसारखी, मृदू, मलायम, कुठे तरी अलगद स्पर्श करून कोपरा काढून नेणारी !

शिवाजी पार्कला पोचलो तेव्हा पाच वाजून गेले होते. चौकात कुठं वळावं हे कुणाला विचारावंच लागलं नाही. एका विशिष्ट दिशेने लोक नुसते जात होते. मीही त्या लोंढ्यात सामील झालो. शिवाजी पार्कचं विस्तीर्ण मैदान. सूर्याची किरणं पसरत चाललेली. सावल्या लांब होत चाललेल्या. शिवाजीमहाराजांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याखालीच सभेचं व्यासपीठ उभारण्यात आलं होतं. व्यासपीठाच्या पुढील भागावरच मोठा कापडी फलक होता. त्यावर लिहिलं होतं— 'न दैन्यम्, न पलायनम् !' शिवाजीमहाराजांच्या पुतळ्याच्या साक्षीने होत असलेल्या सभेचं ब्रीदवाक्य याहून काय असू शकतं ?

मैदानाच्या प्रवेशद्वाराशीच रा. स्व.संघाचे कार्यकर्ते 'जनकल्याण समिती'तर्फे पूरग्रस्तांसाठी निधी गोळा करत होते. लोकांचा प्रतिसादही चांगला होता; पण प्रवेशदारातून आत आल्याबरोबर दोन्ही बाजूंना चणे-शेंगदाणे, भेळ, पाणीपुरी, सरवत, आईस कांडी यांचे स्टॉल्स मात्र फारच खटकले. सभेच्या वातावरणाला ते कुठे तरी एखाद्या जत्रेचं बोट लावत असल्यासारखे वाटले. मैदानाच्या मागल्या मोठ्या रस्त्यावरून आलिशान मोटारी झुळझुळ वाहात होत्या.

साडे पाच होऊन गेले तरी मुख्य वक्त्यांपैकी कोणीच आलं नव्हतं. माईकवरून मात्र दर पाच–दहा मिनिटाला येतच आहेत, वाटेतच आहेत, दारामध्ये आले आहेत, अशा घोषणा केल्या जात होत्या. हळूहळू श्रोत्यांचा संयम सुटायला लागला. व्यासपीठावर मुंबईतले मुख्य नेते बसले होते. त्यात डॉ. सुब्रमण्यम स्वामी आणि राम जेठमलानीही होते. आणीबाणीतल्या पराक्रमापासून स्वामींना लाभलेली सुभाषचंद्र बोसांची

लोकप्रियता अजूनही ओसरलेली नाही. प्रमुख वक्ते येईपर्यंत स्वामींनी बोलावं अशी मागणी श्रोत्यांमधूनच होऊ लागली. शेवटी स्वामी उभे राहिले. भव्य कपाळ, गोरापान वर्ण, पांढरा झब्बा आणि दुटांगी धोतर. अमेरिकेत प्राध्यापकी करणारा हा माणूस अक्षरशः तेजस्वी दिसत होता.

स्वामींनी भाषणाला सुरुवात केली तोच श्री. नानासाहेब गोरे आले. प्रवेशद्वारापासून व्यासपीठापर्यंत तरुण कार्यकर्त्यांनी एक साखळीच तयार केली होती. त्यामधून नानासाहेब व्यासपीठावर आले. समतोल विचाराच्या नानासाहेबांचं व्यक्तिमत्व मध्यंतरीच्या राजकीय पेचप्रसंगात त्यांनी बजावलेली कामगिरी आणि त्यानंतर ब्रिटनमधील राजदूताच्या पदाचा दिलेला राजीनामा यामुळे अधिकच करारी वाटत होतं.

स्वामीनंतर राम जेठमलानी उभे राहिले. अजून मोरारजीभाई आणि अटलजी यायचे होते. बुलंद आवाजात जेठमलानींनी सुरवात केली. जनता पक्षाला जखम झाली आहे पण आम्ही त्यातूनही बर येऊ, राम जेठमलानी हा जनता पक्षासाठी शेवटपर्यंत लढणारा सैनिक असेल, डिसेंबरमध्ये जेव्हा मतपेट्या फुटतील तेव्हा या पापी लोकांना आम्ही मातीला मिळवलं असेल अशी निवडणूक प्रचाराचीच रंगीत तालीम करत जेठमलानींनी टाळ्या घेतल्या. त्यांचं भाषण चालू असतानाच मोरारजीभाई आले. ताडताड पावलं टाकत व्यासपीठापर्यंत पोचले. कोणाचाही हात न धरता व्यासपीठाच्या पायऱ्या चढू लागले. मोरारजींच्या बोलण्या–वागण्यापेक्षा त्यांच्या या तंदुरुस्तीच्या रहस्यावर भारतातले आणि परदेशी लोकही फिदा झाले आहेत. आजच्या सभेचेही मोरारजीभाईच हिरो होते. ते व्यासपीठावर आल्यावर कित्येक श्रोते उठून उभे राहिले. टाळ्यांचा कडकडाट झाला. मोरारजीभाईंचं स्वतःचं नैतिक अधिष्ठान आणि मध्यंतरीच्या राजकीय घडामोडींमधील त्यांचा पवित्रा यामुळे जनतेचं जास्तच प्रेम आणि सहानुभूती मोरारजीभाईंनी मिळवली असल्याचं या ठिकाणीही दिसून आलं. मोरारजीभाईंनंतर थोड्याच वेळानं अटलबिहारी आले आणि 'अब असली सभा शुरु हो रही है' असं सांगून राम नाईक यांनी श्री. नानासाहेब गोरेंना भाषण करण्याची विनंती केली. साध्या, सोप्या मराठीत नानासाहेब श्रोत्यांशी संवाद साधू लागले.

'मला आठवतं, १९७७ साली लोकसभेच्या निवडणुकीसाठी मुंबईतील जनता पक्षाची पहिली प्रचार सभा याच मैदानावर झाली होती आणि मी व अटलजी, आम्ही दोघंही त्यावेळी बोललो होतो. आजही आम्ही दोघं पुन्हा एकदा या व्यासपीठावर आलो आहोत. पण आजची परिस्थिती फार निराळी आहे.

'आज इंदिराजी समोर नाहीत; त्या एका कोपऱ्यात आहेत. एक बुड नसलेलं सरकार आज आमच्याविरुद्ध उभं आहे आणि राष्ट्रपतीही त्यांनाच सामील झाले आहेत. राष्ट्रपतीपदाचा मान राखावा, हे आम्हालाही समजतं. पण त्या पदावरचा मनुष्य त्या लायकीचा असेल तर! राष्ट्रपतींनी या गरीब देशावर निवडणुकीची प्रचंड मोहीम आज लादली आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात देशाची अप्रतिष्ठा व्हायलाही हे राष्ट्रपतीच जबाबदार आहेत. इंदिराजी बाबुजींनाही पाठिंबा द्यायला तयार होत्या. पण इंदिराजींच्या धोकेबाज अटी बाबुजींनी धुडकावून लावल्या. आज पुन्हा एकदा आम्ही रणांगणात उतरलो आहोत.

'मी सभांसाठी विविध ठिकाणी हिंडायला लागलो आहे. प्रत्येक ठिकाणी अजूनही जनता १९७७ सालच्याच संख्येने, हिमतीने आणि तेच पाठबळ आम्हाला देत उभी राहिली आहे, असंच चित्र मला दिसलं. आज दलितांमधल्या एका नेत्याला या देशाचं पंतप्रधानपद नाकारलं गेलं आहे. आता त्यांचा नेता आणि आपला नेता एक आहे, त्यांचं हृदय आणि आपलं हृदय एक आहे, त्यांचे हात आणि आपले हात एक आहेत, पुन्हा एकदा जनमताची शक्ती दाखवण्याची जबाबदारी आज आपल्यावर आली आहे.'

नानासाहेबांनंतर 'युवकहृदय सम्राट अटलबिहारी वाजपेयी भाषण करतील' असं राम नाईकांनी जाहीर केलं आणि अटलजी उभे राहिले. आता चांगली मेजवानी मिळणार या खात्रीने श्रोतेही सरसावले. अटलजींनी बोलायला सुरवात केली.

'नेमकी कुठून सुरवात करू तेच आज कळत नाही. सुरवातीपासून करू की शेवटाकडून? गेल्या महिन्या–दोन महिन्यांमधील राजकीय घडामोडी म्हणजे एक हिंदी फिल्म होती. त्यात ट्रॅजेडी होती, कॉमेडी होती, सस्पेन्सही होता; विश्वासघात होता, पाठीत सुरा खुपसला गेल्याचं दृश्य होतं, सिद्धांतांची हत्या होती. थोडक्यात हा होता 'किस्सा कुर्सीका भाग दो!'

'१९७७ साली निवडणुका झाल्या आणि कागदाच्या तुकड्यांनी एकदम तकदीरच बदलवलं. एका नव्या युगाला या देशात सुरवात झाली. इथल्या गरीब, अर्धशिक्षित, निर्धन, अंधश्रद्धेला बळी पडणाऱ्या माणसाने एकाधिकारशाहीला कचराकुंडीची वाट दाखवली आणि लोकशाही व स्वातंत्र्याच्या बाजूने कौल दिला. पण चूक मतदारांची नव्हती, आम्ही चुका केल्या. जनता विफल नव्हती. नेतृत्व विफल ठरलं. पक्षातून निघून गेलेल्यांना आम्हीच पुन्हा मोठ्या प्रेमानं बोलावलं ही आमची चूक झाली.

'हे लोकही उघड उघड, जाहीरपणे निघून गेले नाहीत. रात्रीच्या अंधारात, गटागटाने यांनी पलायन केलं. आम्ही यांना बोलावलं हा एक किस्सा आहे; पण ते आले हाही एक किस्सा होता. बुद्धिमान चोर घराला भगदाड पाडल्यावर स्वतःचं डोकं आधी आत घालत नाही. आधी तो काठीला एक मडकं बांधून ते आत घालतो.

म्हणज गृहस्थ जर जागा असेल तर मडक्यावर वार होईल, आपल्यावर नाही. नेमकी हीच नीती चरणसिंगांनी अवलंबली. राजनारायणांची खोपडी आधी पुढे करून नंतर पूर्ण विश्वास वाटल्यावर ते स्वत: बाहेर पडले. राजनीतीमध्येही काही नैतिकता राहणार आहे की नाही ? की सारा फक्त सत्तेचाच खेळ राहणार आहे ? या सरकारची खुर्ची गेली; पण आता ते स्टुल पकडून बसले आहेत आणि म्हणताहेत, आता हे मात्र सोडणार नाही.

'राष्ट्रपतीपदाचा मान राखणं आपल्या हातात कधीच नसतं. जो त्या पदावर बसला आहे त्यानेच तो तोल सांभाळायचा असतो. एक दिवसही बहुमत नसलेल्या सरकारचा सल्ला राष्ट्रपती मानतातच कसे ? लोकसभा बरखास्त करण्याचा निर्णय त्यांनी आधीच घेऊन टाकला होता आणि बाबूजी-चंद्रशेखरांना मात्र त्यांनी सांगितले-'पाठिंब्याची यादी सावकाश द्या.' 'सत्यमेव जयते' हे या देशाचं ब्रीदवाक्य आहे. राष्ट्रपती सत्य का बोलले नाहीत ? का त्यांनी बाबुजींना स्वच्छ सांगितलं नाही की मी लोकसभा बरखास्त करण्याचा निर्णय घेतला आहे ? राष्ट्रपतीची प्रतिष्ठा धुळीला कोण मिळवत आहे ? दुटप्पी बोलणं, दुटप्पी वर्तन, लोकशाहीवादी परंपरांवर वज्राघात, राज्यघटनेची अवहेलना कोणी केली ? विरोधी पक्षनेत्याला सरकार बनवायला सांगून ज्या प्रक्रियेची सुरवात झाली होती, तिचा शेवटही तसाच व्हायला हवा होता. स्वत:ला टीकेचा विषय बनविण्यास राष्ट्रपतीच जबाबदार आहेत.

'आज घरभेद्यांनी घराला खिंडार पाडलं आहे. घरातल्या दिव्यानेच घराला आग लावण्याचा प्रयत्न केला आहे. आम्ही काही आश्वासनं दिली होती. काहींची पूर्तीही केली होती. पण बरंच काही करायचंही राहिलं होतं. एक मात्र निश्चित, आम्हाला, या देशाला शरमेनं मान खाली झुकवावी लागेल असं आम्ही काहीही केलं नाही-आम्ही चूक केली तीसुद्धा स्वत:साठी नाही. पक्षासाठी केली. पक्ष एकसंध राहावा म्हणून केली. पंचतंत्रात एक कथा आहे. एकदा एका जंगलाला आग लागते. सगळे पशु-पक्षी सैरभैर पळायला लागतात. एका झाडावर दोन पक्षी राहात असतात. ते ठरवतात, या झाडांच्या आश्रयाने आपण वाढलो, याच्याच सावलीत उन्हापासून स्वत:चा बचाव केला, थंडी-पावसापासून जगण्यासाठी याच्या ढोलीत आश्रय घेतला, या झाडाच्याच फळा-फुलांनी आपलं पोषण केलं. आता त्याला सोडणं योग्य नाही. आपणही या झाडाबरोबरच बेचिराख होऊन जाऊ. आम्हालावाटलं होतं, पक्षी जर इतके इमानदार राहू शकतात तर माणसं का असू नयेत ? पण आमचा तर्क चुकला.

'आज आमची संख्या कमी झाली आहे. पण आम्ही अधिक बलवान, एकसंघ झालो आहोत. आम्हाला एकता हवी आहे, एकरूपता नाही. विविधतेतल्या एकतेचा आम्हाला ध्यास आहे. आम्ही आमची जुनी घरं आता सोडली आहेत, जुने पूल तोडून टाकले आहेत. आता बुडालो तरी एकत्रच बुडू किंवा एकमेकांचा हात धरूनच पैलतीराला लागू.

'महात्माजींचं एक स्वप्न होतं-एक ना एक दिवस दलित मनुष्य या देशाचं राज्य करेल. आज ते स्वप्न भंगलं आहे. ते स्वप्न आम्ही पुन्हा सांधू. तुटलेली पार्टी पुन्हा जोडू, अधिक एकसंध करू. आमची अपुरी वचनं पुरी करण्याचा प्रयत्न करू. या देशात लोकतंत्र पुन्हा आणण्याच्या भाकरी, आणि स्वातंत्र्याचा प्रश्न एकत्रितपणेच सोडवण्याच्या आमच्या या प्रयत्नांना तुमचे हात हवे आहेत,


## नवीन दाखल झालेली काही पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १. | **महाभारतातील मानदंड**-(लेखसंग्रह)-आनंद साधले | रु. १४।- |
| २. | **निळे कमळ**-(कादंबरी)-प्रभाकर सिरास | रु. ११।- |
| ३. | **हितगुज : सहा साहित्यिकांशी**-(सहा साहित्यिकांच्या मुलाखती)-प्रा. भास्कर नंदनवार | रु. १४।- |
| ४. | **अवलोकिता**-(कादंबरी)-पु. शि. रेगे | ५।- |
| ५. | **लोककथा ७८**-(नाटक)-रत्नाकर मतकरी | ६।- |
| ६. | **आस्वाद**-(समीक्षा)-प्रभाकर पाध्ये | १२।५० |
| ७. | **अशी मंडळी बहुत असावी**-यदुनाथ थत्ते | १०।- |

**ENGLISH**

1. **Mysterious Knowledge – ( Occultism – Profusely illustrated )** Francis King & Jeremy Kingstone — Rs. 122/35
2. **Trek The Sahyadris – ( with photographs ) – Harish Kapadia** — Rs. 18/—
3. **The Twenty Ninth Day – ( Ecological disaster is at hand )** Lester R. Brown — Rs. 60/—

† **Another bout of inflation is around the corner. Do not save. Buy a long term subscription membership of Phoenix ! Cheapest is Life-membership !**

**फिनिक्स लायब्ररी ७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०**

तुमची साथ हवी आहे, तुमचा सहभाग हवा आहे !'

अटलजींच्या भाषणानंतर मोरारजी उठले. त्यांच्यासाठी खास खुर्ची व्यासपीठावर आणली गेली. त्या खुर्चीत बसूनच मोरारजींनी बोलायला सुरुवात केली. 'ज्या शहरात मला प्रेम मिळालं तिथेच मी परत आलो आहे...' मोरारजी बोलायला लागले असतानाही टाळ्यांचा कडकडाट चालूच होता. मोरारजींचा गंभीर आवाज, संथ लय थोडी आक्रमक होऊ लागली–

'सौदेबाजी आणि विश्वासघातामुळे आज जनता पक्ष घायाळ झाला आहे; पण हा पक्ष नष्ट करता येणार नाही. कारण तो जनतेनेच निर्माण केला आहे. आजची राजकीय परिस्थिती जरी अतिशय अस्थिर असली तरी जनतेने लोकतंत्राबद्दल मनात शंका येऊ देऊ नये. कारण त्यातूनच हुकुमशाहीचा उदय होतो. अजूनही जनता पक्ष आपल्या उद्देशांपासून दूर हटलेला नाही. उलट तो अधिक शुद्ध आणि एकसंध झाला आहे. तेव्हा भारतीय जनता लोकतंत्राची भोक्ती आहे आणि त्याला धक्का लावणाऱ्या गुन्हेगारांना शासन केल्याशिवाय ती सोडत नाही, याचा जगाला आणखी एकवार अनुभव देण्याची वेळ या निमित्ताने आली आहे. हिंदुस्थानातल्यासारखी जनता जगाच्या पाठीवर कुठेही नाही. म्हणूनच आमचा लढा जनतेशी नाही. स्वतःमधील दुर्बलतेशीच आमचा लढा आहे.

'लाल किल्ल्यावरील चरणसिंगांच्या भाषणाबद्दल काय बोलू ? काही बोलण्याच्या लायकीचं तरी ते असलं पाहिजे. आपल्या सहकाऱ्यांबद्दल असं बोलायला लागण्यासारखी क्लेशकारक दुसरी गोष्ट नाही; पण जनहिताच्या दृष्टीने ते आवश्यक आहे.

'येत्या निवडणुकीत या फुटिरांना आपण असा धडा शिकवू की, इथून पुढे लोकतंत्राला धक्का लावण्याची त्यांची कधी हिंमतच होणार नाही. त्यासाठी मी स्वतः सर्वत्र हिंडेन. कारण माझा कर्मयोगावर विश्वास आहे. ईश्वर यामध्ये मला शक्ती देईलच, जनतेची तर शक्ती आहेच. आम्ही आपल्याला असं आश्वासन देतो की, अशा तऱ्हेने पक्षातून फुटून गेलेल्या लोकांना आम्ही पुन्हा जनता पक्षात घेणार नाही. आजच्या या सभेच्या मुहूर्तावर आपण अशी प्रतिज्ञा करू या की या फुटीरांना आम्ही वेचून वेचून घरी बसवू आणि पुन्हा एकवार लोकतंत्राचं श्रेष्ठत्व सिद्ध करू.'

मोरारजी फार वेळ बोलले नाहीत; पण ते बोलले यावरच श्रोते खूष होते. आजच्या सभेत मोरारजींइतका सन्मान दुसऱ्या कोणालाही मिळाला नाही. एव्हाना आठ वाजून गेले होते. वक्ते व्यासपीठावरून खाली उतरू लागले होते. व्यासपीठाभोवती आणि प्रवेशदाराशीही नेत्यांना पाहण्यासाठी एकच झुंबड उडाली.


जवळजवळ दोन–अडीच वर्षांनी पुन्हा एकदा जनतेचं विराट रूप समोर दिसत होतं. हे दर्शनही माझ्यासारख्या सामान्य माणसाला भारावून टाकणारं होतं. या देशातली माणसं जिवंत असल्याचं ते एक सुखदायक चिन्ह होतं.

–प्रतिनिधी 'माणूस'


**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**

**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........**



# नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर

आवृत्ती : तिसरी (सचित्र)

किंमत : रुपये पंचेचाळीस

**राजहंस प्रकाशन, पुणे**